मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २७५ ■ गुरूवार, १८ जून २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# पिरवाडीच्या समुद्रावर काळ्या तेलाचा तवंग

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : उरण तालुक्यातील नागाव-पिरवाडी समुद्र किनाऱ्यावर पसरलेल्या तेलाच्या तवंगामुळे संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली आहे. एकीकडे पर्यावरण संवर्धनाच्या गप्पा मारल्या जात आहेत, तर दुसरीकडे समुद्राच्या छाताडावर प्रदूषणाचा काळा डाग उमटताना दिसत आहे. समुद्राच्या पाण्यावर मोठ्या प्रमाणात तेलकट थर पसरल्याचे निदर्शनास आले असून, यामागे समुद्रात सोडले जाणारे तेलमिश्रित किंवा रासायनिक सांडपाणी कारणीभूत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

नागाव-पिरवाडी किनाऱ्यावरील पाण्याचा रंग बदललेला दिसत असून अनेक ठिकाणी तेलाचे थर तरंगताना आढळत आहेत. किनाऱ्यावरही तेलकट पदार्थ साचल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. यामुळे समुद्रातील मासळी, कोळंबी, खेकडे, शिंपले तसेच सूक्ष्म



सागरी जीवांच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे उरण परिसरात ओएनजीसी, जेएनपीए, विविध जेट्टया, रासायनिक उद्योग, ऑईल टर्मिनल आणि औद्योगिक प्रकल्प मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहेत. त्यामुळे हा तेलाचा तवंग नेमका कुठून आला, याचा शोध घेण्याऐवजी संबंधित यंत्रणा नेहमीप्रमाणे मौन बाळगून असल्याची टीका होत आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळ, मत्स्य विभाग, पर्यावरण विभाग आणि स्थानिक प्रशासन यांना हा प्रकार दिसत नाही का, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

समुद्रातील सूक्ष्म जीव हे संपूर्ण सागरी अन्नसाखळीचा पाया मानले जातात. तेलामुळे हे सूक्ष्म जीव नष्ट होऊ लागले तर त्याचा थेट परिणाम मासळी उत्पादनावर होणार आहे. परिणामी हजारो मच्छीमार कुटुंबांच्या उदरनिर्वाहावर गदा येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आधीच विविध प्रकल्प, जेट्टया आणि प्रदूषणामुळे मत्स्यव्यवसाय संकटात असताना आता तेलाच्या प्रदूषणाने आणखी एक घाव घातला आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, समुद्रातील प्रदूषित मासळी मानवी शरीरात गेल्यास त्वचारोग, श्वसनाचे विकार, पचनसंस्थेचे आजार तसेच इतर गंभीर आरोग्य समस्या उद्भवू

## प्रदूषण माफिया मोकाट? तर प्रशासन गाढ झोपेत!

शकतात. त्यामुळे हा प्रश्न केवळ पर्यावरणाचा नसून जनतेच्या आरोग्याशी थेट संबंधित आहे.

पर्यावरणप्रेमींचे म्हणणे आहे की, उरण परिसरातील खाड्या, समुद्रकिनारे आणि जलस्रोत दिवसेंदिवस प्रदूषणाच्या विळख्यात अडकत आहेत. एकीकडे डोंगरांची कत्तल, झाडांचा संहार आणि दुसरीकडे समुद्रात रासायनिक व तेलमिश्रित सांडपाणी सोडण्याचे प्रकार सुरू असल्याने निसर्गाचा समतोल पूर्णपणे ढासळत चालला आहे.

सर्वात गंभीर बाब म्हणजे अशा घटना वारंवार घडूनही दोषींवर ठोस कारवाई होताना दिसत नाही. प्रदूषण करणाऱ्यांना राजकीय आणि प्रशासकीय संरक्षण मिळत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे. त्यामुळेच प्रदूषण करणाऱ्यांचे धाडस वाढत असल्याचा आरोप होत आहे. सर्वात गंभीर बाब म्हणजे अशा घटना वारंवार घडूनही दोषींवर ठोस कारवाई होताना दिसत नाही. प्रदूषण करणाऱ्यांना राजकीय आणि प्रशासकीय संरक्षण मिळत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे. त्यामुळेच प्रदूषण करणाऱ्यांचे धाडस वाढत असल्याचा आरोप होत आहे.

स्थानिक मच्छीमार, पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांनी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली आहे. समुद्राच्या पाण्याचे नमुने तातडीने तपासून प्रदूषणाचा स्रोत शोधावा, जबाबदार कंपन्या किंवा यंत्रणांची नावे जाहीर करावीत आणि त्यांच्यावर फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

उरणकर म्हणतात "समुद्र प्रदूषित होत आहे, मासळी मरत आहे, मच्छीमार उद्ध्वस्त होत आहेत, नागरिकांच्या आरोग्यावर संकट ओढवत आहे; तरीही प्रशासन नेमके कोणाची वाट पाहत आहे? एखादी पर्यावरणीय आपत्ती घडल्यानंतरच यंत्रणा जागी होणार का?" आज तेलाचा तवंग दिसतो आहे, उद्या समुद्रातील जीवसृष्टीच नष्ट झाली तर त्याची जबाबदारी कोण घेणार? हा प्रश्न आता संपूर्ण उरणकरांना अस्वस्थ करू लागला आहे. समुद्र हा कोणाच्या बापाची जहागीर नाही; तो भावी पिढ्यांची संपत्ती आहे. प्रदूषण करणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली नाही तर "समुद्र वाचवा" ही घोषणा उद्या केवळ फलकांवरच उरेल, अशी भीती व्यक्त केली जात आहे

# नगरसेविका वेदिका पाटील यांच्या मागणीला यश: भोलेनाथ नगरमध्ये नवीन जलवाहिनीच्या कामाला आजपासून सुरुवात

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत, कल्याण ग्रामिण प्रतिनिधी** : ठाणे महापालिकेच्या प्रभाग क्र. २९ मधील भोलेनाथ नगर येथील नागरिकांच्या पाणी टंचाईच्या समस्येवर अखेर तोडगा निघाला आहे. स्थानिक नगरसेविका सौ. वेदिका साहिल पाटील यांनी केलेल्या मागणीला यश आले असून, आज नवीन जलवाहिनी टाकण्याच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे.

**काय होती मागणी?**

भोलेनाथ नगर हा डोंगराळ भाग असल्याने नागरिकांना मोठ्या प्रमाणात पाणी टंचाईला सामोरे जावे लागत होते. अनेक ठिकाणी जलवाहिनी दूर असून सध्याच्या



उपजलवाहिन्या गटारातून गेल्याने त्या नादुरुस्त झाल्या होत्या. त्यामुळे नागरिकांना दूषित व कमी दाबाने पाणी मिळत होते. तसेच नुकत्याच झालेल्या नालेसफाई दरम्यान काही जलवाहिन्या फुटल्याने पाणीपुरवठा पूर्णपणे खंडित होण्याची भीती होती.

या गंभीर समस्येची दखल घेत नगरसेविका वेदिका पाटील यांनी दि. १२/०५/२०२६ रोजी उपनगर अभियंता, पाणीपुरवठा विभाग, श्री. विनोद पवार यांना पत्र लिहून भोलेनाथ नगरमध्ये १०० मि.मी. आणि ८० मि.मी. व्यासाची नवीन उपजलवाहिनी तातडीने टाकण्याची मागणी केली होती.

**मागणीला यश, आज कामाला सुरुवात:** नगरसेविका वेदिका पाटील यांच्या पाठपुराव्याला यश आले असून, आज नागरिकांना दिलेले वचन पूर्ण करत नवीन जलवाहिनी टाकण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे.

या शुभ प्रसंगी नगरसेविका सौ. वेदिका पाटील, नगरसेवक श्री. बाबाजी पाटील व नगरसेविका सौ. अर्चना पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत श्रीफळ फोडून कामाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी साहिल पाटील, बाळाराम पाटील, कृष्णा मडीवाल व भाजप पदाधिकारी सतीश मिश्रा, नागेश मडीवाल, राहुल, जय पाटील, यश पाटील, सलीम सय्यद, ,राजकुमार गुप्ता यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**नागरिकांकडून आभार :** "पाणी हा मूलभूत प्रश्न होता. वेदिका ताईंनी मागणी केली आणि लगेच कामही सुरू केले. दिलेला शब्द पाळल्याबद्दल त्यांचे खूप खूप आभार," अशा भावना नागरिकांनी व्यक्त केल्या.

# मुदगल येथे वादळी वाऱ्याने सोलार पॅनलचे नुकसान


**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे** : पाथरी/ तालुक्यातील मुदगल शिवारात दि ६ जून रोजी अचानक रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास झालेल्या वादळीवाऱ्यासह पावसामुळे पाथरी तालुक्यातील मुदगल येथील शेतकरी शिला छगन बोचरे यांच्या शेतातील सोलार संचचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे बोचरे यांचे गट क्रमांक १८९ मधील शेतात उभारण्यात आलेल्या सोलार पॅनलच्या यंत्रणेवर वादळीवाऱ्याचा जोरदार




तडाखा बसल्याने सोलार संचचे व संबंधित साहित्याचे नुकसान झाले आहे या घटनेमुळे शेतीच्या व्यवस्थेवर परिणाम झाला असून शेतकऱ्यांला आर्थिक फटका बसला आहे अचानक आलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे झालेले नुकसान पाहता संबंधित विभागाने पंचनामा करून शासनाकडून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकरी शिला छगन बोचरे यांनी केली आहे




# ‘नीट’ पुनर्परीक्षा ; हेलिकॉप्टरचा वापर होणार

**तिरुनेलवेली** : ‘नीट’ २०२६ च्या प्रश्नपत्रिका कडक सुरक्षा व्यवस्थेत पोहोचवण्याच्या तयारीचा एक भाग म्हणून, भारतीय लष्कराच्या हेलिकॉप्टरने तिरुनेलवेली येथील सशस्त्र राखीव पोलीस मैदानावर प्रायोगिक तत्त्वावर लँडिंग केले. गेल्या महिन्यात झालेली ‘नीट’ परीक्षा प्रश्नपत्रिका फुटीच्या आरोपांनंतर रद्द करण्यात आली होती, ज्यानंतर अधिकाऱ्यांनी २१ जून रोजी ही पुनर्परीक्षा घेतली जाईल अशी घोषणा केली.प्रश्नपत्रिका लीक होऊ नयेत आणि परीक्षा अत्यंत पारदर्शक व न्याय्य वातावरणात पार पडावी यासाठी, अधिकाऱ्यांनी अगदी शेवटच्या क्षणी हेलिकॉप्टरचा वापर करून परीक्षा केंद्रांवर प्रश्नपत्रिका पोहोचवण्याची व्यवस्था केली आहे.

# पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्या तरुणाला अटक

**जयपूर** : अलवार येथील इतराणा लष्करी छावणीतून पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपावरून सुरक्षा यंत्रणांनी एका तरुणाला ताब्यात घेतले आहे. प्राथमिक तपासात असे समोर आले आहे की, जोधपूरचा रहिवासी असलेला कुंदन बिश्नोई (२०) हा पाकिस्तानी इंटेलिजन्स ऑपरेटिव्ह (पीआयओ) साठी सक्रिय एजंट म्हणून काम करत होता.सुरक्षा यंत्रणांनी दिलेल्या माहितीनुसार, बिश्नोई पैशांच्या मोबदल्यात भारतीय लष्कराची छावणी आणि संवेदनशील भागांची माहिती पाकिस्तानला पुरवत असे. या पैशांचा वापर तो माहिती गोळा करण्यासाठी छावणी परिसरात राहणाऱ्या शाळकरी आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी मैत्री करण्यासाठी करत असे. त्याने ‘ऑपरेशन सिंदूर’ दरम्यानही पाकिस्तानला गुप्त माहिती पाठवली होती.

# समाजकारणातून नेतृत्वापर्यंतचा प्रवास;
## रवींद्र नाईक यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव

**दैनिक युवक आधार पनवेल**
**मुकुंद कांबळे सहसंपादक, प्रतिनिधी :**
साध्या कुटुंबातून आलेल्या एका कार्यकर्त्याने समाजकारण, राजकारण आणि कामगार चळवळीत आपल्या कार्याचा ठसा उमटवत नेतृत्वाची उंची गाठावी, ही प्रेरणादायी कहाणी म्हणजे रवींद्र तुकाराम नाईक यांची होय. उद्या त्यांचा वाढदिवस असून विविध सामाजिक, राजकीय, कामगार आणि वाहतूक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेतून सामाजिक आणि राष्ट्रसेवेचे संस्कार घेतलेल्या रवींद्र नाईक यांनी १९९६ साली तत्कालीन उपमुख्यमंत्री स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या हस्ते पनवेल शहर युवक अध्यक्षपदाची धुरा स्वीकारली. याच काळात त्यांच्या राजकीय आणि सामाजिक वाटचालीची औपचारिक सुरुवात झाली. १९९६ ते २००० या कालावधीत त्यांनी सक्रिय राजकारणात काम केले.

२००४ नंतर रायगडचे लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर तरुण नेतृत्व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या यंग ब्रिगेडमध्ये काम करण्याची संधी रवींद्र नाईक यांना मिळाली. त्या निवडक सहकाऱ्यांमध्ये त्यांचा समावेश होता आणि तेव्हापासून आजपर्यंत त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या खांद्याला खांदा लावून संघटनात्मक व सामाजिक कार्य सुरू ठेवले आहे.

जुलै २००५ मधील महापुरानंतर हजारो नागरिकांचे संसार उद्ध्वस्त झाले होते. त्या संकटाच्या काळात पूरग्रस्तांच्या मदतीसाठी पुढाकार घेण्याची संधी त्यांना लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली मिळाली. या कार्यातून त्यांच्या समाजसेवेची खरी ओळख निर्माण झाली.

२००६ मध्ये नगरपालिका निवडणुकीत महिला आरक्षणाच्या जागेवरून त्यांच्या पत्नी वर्षा नाईक यांना उमेदवारी मिळाली आणि त्या प्रचंड मताधिक्याने नगरसेविका म्हणून निवडून आल्या. एका सामान्य कुटुंबातील महिलेला लोकप्रतिनिधी होण्याची संधी मिळवून देण्यात ठाकूर कुटुंबाचे योगदान असल्याची भावना नाईक आजही व्यक्त करतात.



रवींद्र नाईक यांची ओळख आजही आमदार प्रशांत ठाकूर यांचे विश्वासू, प्रामाणिक आणि कट्टर समर्थक कार्यकर्ते अशीच आहे. पक्ष आणि संघटना बळकट करण्यासाठी त्यांनी वंदे मातरम संघटनेच्या माध्यमातून पनवेल, तालुका आणि रायगड जिल्ह्यात सुमारे ७० नाके उभारून संघटनात्मक जाळे मजबूत केले.








पनवेल परिसरातील अनेक बोगस बिल्डरांकडून फसवणूक झालेल्या गोरगरिबांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून अनेक नागरिकांना त्यांचे पैसे परत मिळवून देण्याचे निःस्वार्थी कार्य त्यांनी केले. कामगार, रिक्षा-टॅक्सी चालक, वाहतूक क्षेत्रातील घटक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी त्यांनी सातत्याने लढा दिला.

त्यांच्या प्रामाणिक कार्याची दखल घेत भारतीय जनता पक्षाचे नेते आमदार प्रशांत ठाकूर आणि उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी त्यांची उत्तर रायगड जिल्हा कामगार आघाडी अध्यक्षपदी नियुक्ती केली. तसेच वाहतूक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत पुरोगामी पत्रकार संघटनेचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष सूर्यवंशी यांनी त्यांची वाहतूक सेवा समितीच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी निवड केली.

आज एक सामान्य कार्यकर्ता ते प्रभावी नेता हा प्रवास त्यांनी आपल्या कर्तृत्वाने पूर्ण केला आहे. त्यांच्या या यशस्वी वाटचालीत लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, परेश ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, माजी नगरसेविका वर्षा नाईक, कुटुंबीय, सहकारी पदाधिकारी, हितचिंतक आणि असंख्य कार्यकर्त्यांचे मोठे योगदान असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे.

सामाजिक बांधिलकी, संघटन कौशल्य, कार्यकर्त्यांप्रती असलेली आत्मीयता आणि सर्वसामान्यांसाठी लढण्याची वृत्ती यामुळे रवींद्र नाईक यांनी समाजात वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवर, कार्यकर्ते व नागरिकांकडून त्यांना शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# वडघर ग्रामपंचायती मार्फत विठ्ठलवाडी येथे पावसाळापूर्व धूर व औषध फवारणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल/प्रतिनिधी :** पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ नये आणि डासांचा प्रादुर्भाव रोखला जावा, यासाठी वडघर ग्रामपंचायतीच्या वतीने विठ्ठलवाडी येथे धूर फवारणी (फॉगिंग) आणि कीटकनाशक औषध फवारणी मोहीम राबविण्यात आली.

पावसाळ्यात डासांची उत्पत्ती वाढल्याने मलेरिया, डेंग्यू, चिकुनगुनिया यांसारख्या आजारांचा प्रसार होण्याची शक्यता असते. हीच बाब लक्षात घेऊन ग्रामपंचायतीने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून ही मोहीम हाती घेतली. विठ्ठलवाडी येथील गल्लीबोळ, नाल्यांच्या परिसरासह सार्वजनिक ठिकाणी ही फवारणी करण्यात आली. ही मोहीम वडघर ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक संतोष पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच कार्यालयीन कर्मचारी प्रकाश डाकी, अनिल परदेशी आणि जगदीश पाटील यांच्या विशेष



प्रयत्नाने व चिकाटीने यशस्वीपणे राबविण्यात आली. ग्रामपंचायतीच्या या तत्परतेबद्दल आणि आरोग्याविषयी घेतलेल्या काळजीबद्दल विठ्ठलवाडी येथील ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

**नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी..**

पावसाळ्याच्या दिवसांत नागरिकांनी आपल्या घराभोवती पाणी साचू देऊ नये आणि आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहनही याप्रसंगी ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आले आहे.

# अकोट आत्मा अंतर्गत अल निनोच्या पार्श्वभूमीवर अडगाव खुर्द येथे किसान गोष्टी कार्यक्रम संपन्न !!

**दैनिक युवक आधार**
**दिलीप कराळे/प्रतिनिधी :** कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत अल निनोच्या पार्श्वभूमीवर खरीप हंगामात करावयाच्या उपाययोजना, नैसर्गिक शेती, रासायनिक खतांचा संतुलित वापर व व्यवस्थापन तसेच कापूस, सोयाबीन व तूर पीक लागवड तंत्रज्ञान या विषयांवर अडगाव खुर्द येथे आयोजित किसान गोष्टी/क्षेत्रीय दिन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी तथा प्रकल्प संचालक (आत्मा) अकोला डॉ. मुरली इंगळे, प्रकल्प उपसंचालक (आत्मा) डॉ. प्रेमसिंग मारग, उपविभागीय कृषी अधिकारी अकोट तुषार ढंगारे व तालुका कृषी अधिकारी अकोट निलेश सुरडकर यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार, दि. 16 जून रोजी सायंकाळी 7 वाजता लक्ष्मीमाता सभागृह, अडगाव खुर्द (ता. अकोट) येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात कृषी विज्ञान केंद्र, अकोला येथील विषय विशेषज्ञ कुलदीप देशमुख यांनी अल निनोच्या संभाव्य परिणामांच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी अवलंबावयाच्या उपाययोजना, कापूस, सोयाबीन व तूर पिकांचे सुधारित लागवड तंत्रज्ञान तसेच नैसर्गिक शेतीचे फायदे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. सर्ग विकास समिती, अकोला येथील नागोराव भास्कर यांनी नैसर्गिक



शेतीचे महत्त्व,जैविक निविष्ठांची निर्मिती व वापर याबाबत माहिती दिली.यावेळी तालुका कृषी अधिकारी निलेश सुरडकर यांनी कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांची माहिती देऊन शेतकऱ्यांना त्यांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. सहायक तंत्रज्ञान व्यवस्थापक राहुल अडाणी यांनी रासायनिक खतांचा संतुलित व विवेकपूर्ण वापर, हुमनी अळी व्यवस्थापन तसेच 'खेत बचाओ' अभियानाच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले.कार्यक्रमास मंडळ कृषी अधिकारी अकोट-1 पवन सुलताने यांच्यासह अडगाव खुर्द परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन राहुल अडाणी यांनी केले.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी लक्ष्मीमाता शेतकरी उत्पादक गटाचे अध्यक्ष रमेश धुळे व सचिव संतोष वाघोडे यांनी विशेष परिश्रम घेतले. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या किसान गोष्टी कार्यक्रमामुळे शेतकऱ्यांना आधुनिक, शाश्वत व हवामान बदलाशी सुसंगत शेती तंत्रज्ञानाची उपयुक्त माहिती मिळाली.

# डी जी रंगारी यांना राज्यस्तरीय पत्रकारितपुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**भंडारा प्रतिनिधी :** साकोली येथील रहिवासी डी जी रंगारी यांच्या पहेला येथे प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाचे राज्य सरचिटणीस संजीव भांबोरे यांच्या वाढदिवसानिमित्त सन्मान घ्या व सन्मान द्या या उपक्रमांतर्गत जे सामाजिक कार्यकर्ते पत्रकारिता, सामाजिक, पर्यावरण ,प्रशासन कला व इतर क्षेत्रांमध्ये हे उत्कृष्ट कार्य करतात परंतु शासन स्तरावर त्यांची दखल घेतली जात नाही आणि म्हणून अशा कार्यकर्त्यांची दखल व्हावी त्यांच्या कार्याची कदर व्हावी व समोर आणखी त्यांच्या कार्यांना वाव मिळावा या दृष्टिकोनातून सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांचा भव्य पुरस्कार सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता

भंडारा जवळील पहेला बौद्धविहार



पटांगणात कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता त्यामध्ये पत्रकार सामाजिक कार्यकर्ते व महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त डी जी रंगारी यांना उत्कृष्ट राज्यस्तरीय पत्रकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले

या अगोदर सुद्धा अनेक पुरस्कार डी जी रंगारी यांना अनेक पुरस्कार मिळालेले आहेत विविध सामाजिक क्षेत्रात अनेक चळवळीत नेहमीच ते सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असतात यांप्रसंगी माजी खासदार खुशाल बोपचे, दैनिक माझ्या मराठवाड्याचे मुख्य संपादक दशरथ सुरडकर ,फिल्म अभिनेता अश्विनकुमार वाघाले, फिल्म अभिनेत्री चैताली भस्मे, माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्ण, ब्लू स्टार टीव्ही न्यूज चॅनलच्या संपादक पत्रकार संजीव भांबोरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत श्रीफळ पुष्पगुच्छ स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले तिच्या पुरस्काराबद्दल साकोली तनुजा नागदेवे,आकाश रंगारी,शितल नागदेव , व, विद्या रंगारी, अशी रंगारी सर्व मित्र परिवार व कार्यकर्ते यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे

# अमरकंठ बांडेबुचे विदर्भ स्तरीय समाजभूषण पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**भंडारा -वार्ताहर :** भंडारा तालुक्यात इंजेवाडा येथे वास्तव्यात असलेले अमरकंठ बांडेबुचे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन पहेला येथे सन्मान द्या व सन्मान घ्या या प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस सरचिटणीस संजीव भांबोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळयानिमित्त सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विविध सामाजिक क्षेत्रातील पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते, प्रबोधनकार, कवी, शासकीय कर्मचारी , अधिकारी , शाहीर, कलाक्षेत्र व इतर क्षेत्रांमध्ये हे उत्कृष्ट कार्य करतात .परंतु शासन स्तरावर त्यांची दखल घेतली जात नाही म्हणून अशा कार्यकर्त्यांची दखल व्हावी, त्यांच्या कार्याची कदर व्हावी , व त्यांना सन्मान मिळावा , व त्यांच्या



कार्याला गती मिळावी या उदात्त हेतूने सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांचा भव्य पुरस्कार सत्कार सोहळा सम्यक बुद्ध विहार पहेला येथील प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. अमरकंठ बांडेबुचे मागील पंधरा वर्षापासून सामाजिक कार्यात अग्रेसर असून त्यांच्या कार्याची पावती म्हणून त्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र ,पुष्पगुच्छ , मानाचा फेटा देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यांप्रसंगी डॉ.खुशाल बोपचे माजी खासदार तथा राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघ , दैनिक माझा मराठवाडा तथा ज्ञानपंख न्यूज चॅनलचे चे मुख्य संपादक दशरथ सुरडकर ,फिल्म अभिनेता अश्विनकुमार वघाले, फिल्म अभिनेत्री चैताली भस्मे, अशोकराव सोनवणे फुले, शाहू ,आंबेडकर चळवळीतील ज्येष्ठ विचारवंत छत्रपती संभाजी नगर, माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्ण, ब्लू स्टार्म टीव्ही न्यूज चॅनलचे संपादक पत्रकार संजीव भांबोरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ , पुष्पगुच्छ ,मानाचा फेटा देऊन सन्मानित करण्यात आले .

त्यांच्या या मिळालेल्या राज्यस्तरीय पुरस्काराबद्दल त्यांच्या अनेक च्या त्यांनी त्यांचे अभिनंदन केलेले आहे.

# विडोळी येथील संतप्त शेतकऱ्यांचे बैलगाडी व मुला-बाळासह तहसिलच्या आवारात आंदोलन

**दैनिक युवक आधार**
**उपसंपादक :- राजू शिंदे :** मंठा तालुक्यातील विडोळी ते देवठाणा (मंठा) येथील शिव पांदण रस्स्त्याच्या कामात सतत अडथळा निर्माण करुन शेतात जाणाऱ्या रस्त्याचे काम अडविणाऱ्या गैरअर्जदार शेतकऱ्यांविरुद्ध कारवाई करुन रस्ता खुला करून देण्याच्या मागणीसाठी विडोळीतील शेतकऱ्यांचे मागील १६ दिवसांपासून तहसिल कार्यालयासमोर उपोषण सुरू असून, आज मंगळवारी (ता. १६) आपल्या न्याय मागणीसाठी हतबल शेतकऱ्यांनी बैलगाडी व मुलाबाळांसह तहसिल कार्यालयावर मोर्चा काढला.

या आंदोलनामुळे शेतकऱ्यांचे घरदार आणि शेतीकडे पुर्णतः दुर्लक्ष झाल्यामुळे शेतकरी संतप्त झाले. अखेर नायब तहसिलदार श्री. काळदाते यांनी हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे ८ दिवसाची स्थगिती असल्याचे सांगून अर्जदार व गैरअर्जदार यांची सुनावणी तसेच पंचनामे, कागदपत्रे पाहून ८ दिवसात निर्णय देण्याचे आश्वासन दिल्याने शेतकऱ्यांनी आपले आंदोलन तात्पुरते मागे घेतले. मात्र, ८ दिवसात न्याय न मिळाल्यास पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला.

विडोळी खुर्द येथील शेतकऱ्यांच्या पुर्वीपासून वडिलोपार्जीत शेतजमीनी





असून, शिवारामध्ये जवळपास १०० ते १५० शेतकरी आहेत. त्यांना शेतात जाण्याकरिता विडोळी ते देवठाणा (मंठा) येथील शिवपांदण रस्त्याचे काम जवळपास २ किमी पूर्ण झालेले आहे. त्यानंतर शेतापर्यंत जाण्याकरिता केवळ २०० ते ३०० मीटर रस्त्याचे काम अपूर्ण राहिले आहे आणि ते अपूर्ण रहिलेले काम काही शेतकऱ्यांनी अडविले आहे. अपूर्ण राहिलेल्या या कामासाठी अनेक वेळा पाठपुरावा करुनही प्रशासनाने अद्यापपर्यंत रस्ता खुला करुन दिला नाही. त्यामुळे न्याय कोणाकडे मागावा असा सवाल आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असून, या दोनशे ते तीनशे मीटर रस्त्यावर गुडघाभर पाणी साचून त्यामध्ये साप, विंचू शेतकऱ्यांना इजा करण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी रस्ते खुले करुन द्यावेत. याबाबत शासन निर्णय असताना सुद्धा शासनाच्या आदेशाला गैर अर्जदार शेतकरी हे केराची टोपली दाखवीत

**शेतकऱ्यांच्या संतापाचा उद्रेक**
**न्यायप्रविष्ट प्रकरणामुळे आठ दिवसात निर्णय देण्याचे तहसीलदाराचे आश्वासन**

आहेत. मोजणी व पंचनामे झालेले असताना सुद्धा रस्ता आडविणाऱ्या शेतकऱ्यांना ते मान्य नाही. त्यामुळे हतबल झालेल्या शेतकऱ्यांनी आंदोलन आणखी तीव्र केले असून आज बैलगाडीसह गुरढोरं, महिला, लहान मुले सर्वच या मोर्चात सहभागी झाले होते. अखेर तहसिलदारांच्या लेखी आश्वासनानंतर आंदोलनकर्त्यांनी आपले आंदोलन तात्पुरते स्थगित केले आहे. मात्र, न्याय न मिळाल्यास आंदोलन आणखी तीव्र केले जाईल, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला. उपोषणार्थीमध्ये आदिनाथ अशोकराव गोरे, विष्णु सोपानराव गोरे, एकनाथ ज्ञानोबा अवचार, अशोक बाबुराव गोरे यांच्यासह शेकडो शेतकऱ्यांचा सहभाग आहे. यावेळी पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख यांच्यासह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# पालखेड विद्यालयात ढोल ताशांच्या गजरात नवागतांचे स्वागत

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना शालेय प्रवाहात आणावे त्यांना दर्जेदार शिक्षण देण्यात यावे, मुक्त शिक्षण द्यावे या दृष्टीने महाराष्ट्र शिक्षण संस्था संचलित न्यू इंग्लिश स्कूल पालखेड,ता.निफाड येथे शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना ढोल ताशांचा गजरात शाळेत प्रवेश देण्यात आला.याप्रसंगी महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष निवृत्तीनाना थेटे,शरद आहेर, विजय गायकवाड, योगेश होलगडे, संतोष आहेर, जितेंद्र थेटे, संदीप गांगुर्डे,समाधान थेटे, माजी मुख्याध्यापक डी.एम.थेटे, विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमन रंजनामाई थेटे, बाळासाहेब थेटे,ज्ञानेश्वर जाधव,रमेश शिंदे,महेंद्र छाजेड, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सतीश थेटे, शिक्षक पालक संघाचे अध्यक्ष विजय आहेर, उपाध्यक्ष रविंद्र कोकाटे,मुख्याध्यापक अशोक शेळके,केशव खैरे, भाऊसाहेब शिंदे, वसंत कहाणे,संदीप आहेर,भरत आहेर,सुरेश चारोस्कर,अर्जुन जाधव,दौलत चौधरी यांचं पालखेड पंचक्रोशीतील ग्रामस्थ व्यासपीठावर होते.



यावेळी विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी आकर्षक रांगोळी, फलकलेखन याचबरोबर ढोल ताशांचा गजरात नवागतांचे मिरवणूक काढून स्वागत करण्यात आले.यावेळी नवीन दाखल झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे औक्षण व गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.तसेच सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक देखील मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात येऊन विद्यार्थ्यांना गोड शिरा आणि मसाले भाताची मेजवानी देखील देण्यात आली.

तसेच विद्यालयाचे माजी विद्यार्थी कृष्णा चव्हाण,कृष्णा थेटे पॅरा कमांडो तर कुणाल चौधरी यांची पोलीस दलात निवड झाली, त्यांच्या यशाबद्दल विद्यालयाच्या वतीने सन्मान करण्यात आला. याप्रसंगी विद्यालयास बेंचेस उपलब्ध करून देण्यात मोलाचे सहकार्य करणारे अर्जुन जाधव यांचाही सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यालयातील शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सावन जाधव यांनी तर आभार संजय लव्हंगडे यांनी मानले.

# ‘कोकणदीप’ मासिकाच्या 24 व्या वर्धापनदिना निमित्त राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रतिनिधी** : ‘कोकणदीप’ मासिकाच्या २४ व्या वर्धापन दिनानिमित्त राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा १४ जून २०२६ रोजी दादर (पूर्व), मुंबई येथील मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या सुरेंद्र गावस्कर सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दापोली विधानसभेचे शिवसेना संपर्क प्रमुख मा. श्री. सुधीरभाऊ कदम होते. नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्या सौ. मिनाक्षी विनय शेडगे तसेच समाजभूषण पुरस्कार विजेते श्री. संतोष परब हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांना ‘कोकणदीप राज्यस्तरीय पुरस्कार - २०२६’ प्रदान करून गौरविण्यात आले. ज्येष्ठ पत्रकार श्री.सुकृत खांडेकर, गिरणी कामगार संघर्ष समितीचे अध्यक्ष श्री. प्रवीण घाग आणि ज्येष्ठ साहित्यिक प्रा.




बाळासाहेब तोरसकर यांना ‘कोकणदीप जीवन गौरव पुरस्कार’ देऊन सन्मानित करण्यात आले.

मुंबईचे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. रामचंद्र अशोक नागरगोजे, वन्यवाणी फाऊंडेशनचे संस्थापक तसेच ‘वाइल्ड लाईफ प्लेज’ या नवीन नाट्य प्रकाराचे निर्माते श्री. मकरंद सावंत, कवी अशोक पुंडलिक ऊर्फ भाई नार्वेकर आणि ॲड . निलेश राऊत यांना ‘कोकणदीप गौरव पुरस्कार’ प्रदान करण्यात आला.

सामाजिक कार्यकर्ते व युवा नेतृत्व श्री. प्रविण लाड, कवी श्री. राजेंद्र चौधरी, प्रविण महादेव घाटविलकर महाराज तसेच ज्येष्ठ कवी श्री. विलास देवळेकर यांना ‘कोकण भूषण पुरस्कार’ देऊन गौरविण्यात आले. तर कुमार रोशन मोडकळे, पत्रकार सोनल महाडीक, उद्योजक चंद्रकांत पांढरे आणि सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार शशिकांत सावंत यांचा ‘कोकणरत्न पुरस्कार’ देऊन सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते कोकणदीप मासिकाचे आणि प्रभू अग्रहारकर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या सोहळ्याचे आयोजन ‘कोकणदीप’ प्रकाशनाचे संस्थापक संपादक श्री. दिलीप शेडगे आणि उपसंपादक श्री. विद्याधर शेडगे यांनी केले होते. कार्यक्रमाला माजी शिक्षणाधिकारी डॉ. जीवबा केळुसकर, महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. प्रकाश पाटकर, सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष श्री. मारुती विश्वासराव, महाराष्ट्र मराठी वृत्तपत्र लेखक संघाचे अध्यक्ष एकनाथ बिरवडकर, समाजसेवक रणजित जाधव, रविंद्र साळवी, रविंद्र बैकर, नितिन सुखदरे, दत्ता खंदारे, संताजी शेडगे, यांच्यासह साहित्य, सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. प्रसाद महाडीक यांनी केले. ‘कोकणदीप’च्या २४ व्या वर्धापन दिन सोहळ्याने समाजातील गुणवंतांच्या कार्याचा गौरव करत नव्या पिढीसाठी प्रेरणादायी संदेश दिला.

# धानोरा फाटा येथे मंदिर व सभागृहाचा भूमिपूजन सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : धानोरा फाटा येथील श्री काशी विश्वेश्वर महादेव मंदिर परिसरात, प्रभू श्रीराम मंदिर तसेच मुर्डेश्वर संस्थानचे पिठाधीश ब्रह्मलीन प.पू. काशिगिरी महाराज यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ उभारण्यात येणाऱ्या मंदिर व सभागृहाचा भव्य भूमिपूजन सोहळा नुकताच उत्साहात संपन्न झाला.या मंगलप्रसंगी श्री काशी विश्वेश्वर महादेव मंदिराचे पिठाधीश प.पू. बालयोगी



सर्वानंद सरस्वती महाराज तसेच प.पू. महादेवानंद महाराज यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली विधिवत पूजा-अर्चना, मंत्रोच्चार व विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. या सोहळ्यामुळे संपूर्ण परिसर भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघाला होता.या कार्यक्रमास सिल्लोड -सोयगाव मतदारसंघाचे नेते सुरेशजी बनकर, माजी आमदार सांडू पाटील लोखंडे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष सुनील मिरकर, भाजप जिल्हा सचिव कमलेश कटारिया, जिल्हा परिषद सदस्य राधाकृष्ण काकडे, पंचायत समिती सदस्या वृषालीताई मिरकर , माजी सभापती ज्ञानेश्वर तायडे, जगदीश कवाल, नगरसेवक स्वप्निल शिंगारे, सुभाष बमनावत, ज्ञानेश्वर काकडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, भाविक-भक्त व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.या मंदिर व सभागृहाच्या उभारणीमुळे परिसरातील धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यांना नवी दिशा मिळेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

# अनियमित पावसामुळे श्रीवर्धनमधील शेतकरी संकटात; पाणीटंचाईसोबत शेतीचेही मोठे नुकसान

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित** : अननिनोच्या प्रभावामुळे यंदा कोकणात मान्सूनच्या आगमनाला विलंब झाला असून, जून महिन्याच्या सुरुवातीला झालेल्या दोन दिवसांच्या पावसानंतर पुन्हा पावसाने दडी मारली आहे. त्यामुळे तालुक्यातील शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत.

सुरुवातीच्या पावसाच्या भरवशावर अनेक शेतकऱ्यांनी भात पेरणीची कामे पूर्ण केली होती. मात्र त्यानंतर पाऊस गायब झाल्याने अनेक ठिकाणी बियाणे उगवले नाही, तर काही ठिकाणी उगवलेली रोपे उन्हामुळे करपून गेली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर दुबार पेरणीचे मोठे संकट उभे राहिले आहे.

रखरखत्या उन्हामुळे भात पिकाला आलेले फुटवे आणि रोपांची वाढ खुंटली असून, शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. पावसाच्या प्रतीक्षेत असलेला शेतकरी



आता आकाशाकडे डोळे लावून बसला आहे.

एकीकडे तालुक्यात पाणीटंचाईचे सावट कायम असून, ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर होत आहे. तर दुसरीकडे शेतीचे नुकसान होत असल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे.प्रशासनाने परिस्थितीचे तातडीने सर्वेक्षण करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत, दुबार पेरणीसाठी बियाणे उपलब्ध करून देणे तसेच भविष्यातील पाणी नियोजनासाठी ठोस उपाययोजना करणे गरजेचे असल्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. आता श्रीवर्धनचा शेतकरी केवळ पावसाच्या आगमनाची वाट पाहत असून, वेळेवर पाऊस न झाल्यास शेतीचे मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# अर्धापूर तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांची एनडीएला प्रेरणादायी भेट

## "आम्हीही सैन्यात जाऊन देशसेवा करणार" – विद्यार्थ्यांचा निर्धार

**तालुका प्रतिनिधीअर्धापूर अरविंद पांचाळ** : आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांच्या मनात देशप्रेमाची ज्योत प्रज्वलित करणारा एक प्रेरणादायी उपक्रम नुकताच पार पडला. भोई प्रतिष्ठान आणि अर्धापूर तालुका मराठी पत्रकार संघाच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या ‘पुण्यजागर’ प्रकल्पातील अर्धापूर तालुक्यातील विद्यार्थ्यांची पुण्यातील जगप्रसिद्ध एनडीएला शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली होती.

अर्धापूर तालुक्यातील. आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी पुण्यजागर हा शैक्षणिक प्रकल्प सुरू आहे. या प्रकल्पातील विद्यार्थ्यांनी एनडीएच्या सुमारे ७००० एकर परिसरात भूदल, नौदल आणि हवाई दलाच्या प्रशिक्षण व्यवस्थेची प्रत्यक्ष माहिती घेतली. विमाने, हेलिकॉप्टर, ड्रोन, अश्वदल तसेच विविध लष्करी साधने प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थी भारावून गेले.

भेटीदरम्यान एनडीएच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी अत्यंत आपुलकीने संवाद साधला. सैन्यदलातील कठोर प्रशिक्षण, शिस्त, देशसेवा आणि त्याग याविषयी माहिती देणारी चित्रफीतही विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली. भारत-पाक युद्धातील विजयाचे प्रतीक म्हणून जतन करून ठेवलेला पाकिस्तानी ध्वज पाहून विद्यार्थ्यांनी भारतीय सैनिकांच्या शौर्याला मनोमन सलाम केला.

एनडीएच्या अत्याधुनिक मेसमध्ये एका टेबलवर ठेवलेले जेवणाचे ताट आणि समोरची रिकामी खुर्ची पाहून विद्यार्थ्यांची उत्सुकता वाढली. त्यावेळी अधिकाऱ्यांनी युद्धात बेपत्ता झालेल्या जवानांच्या स्मरणार्थ दररोज ते ताट ठेवले जाते, अशी माहिती दिली. ही

**या उपक्रमाचे संयोजक, भोई प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य युवा धोरण समितीचे मानद सदस्य डॉ. मिलिंद भोई यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी शिक्षण न देता त्यांच्यात देशप्रेम, राष्ट्रभक्ती आणि देशसेवेची भावना रुजविणे हा या भेटीमागील मुख्य उद्देश होता. “सेवा परमो धर्मः ” हा मंत्र जगणाऱ्या भारतीय सैन्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.**

**विद्यार्थिनी दुर्गा क्षीरसागर आणि नियती इंगोले यांनी एनडीएच्या परिसरातील पवित्र माती स्मृतिचिन्ह म्हणून सोबत घेतली. “भाविक काशीहून गंगाजल घेऊन येतात, आम्ही भारतमातेच्या या पवित्र भूमीची माती घेऊन जात आहोत. एक दिवस एनडीएमध्ये प्रवेश मिळवून देशसेवा करू,” असा संकल्प त्यांनी यावेळी व्यक्त केला.**

भावना ऐकून उपस्थित विद्यार्थी आणि शिक्षक भावूक झाले.

भेटीच्या शेवटी विद्यार्थ्यांनी अधिकाऱ्यांशी संवाद साधताना, “आमचे वडील आमच्यात नाहीत, पण आम्ही खूप अभ्यास करू आणि सैन्यात भरती होऊन तुमच्यासारखीच देशसेवा करू,” असे सांगितले. विद्यार्थ्यांचा हा निर्धार ऐकून अधिकारीही गहिवरून गेले.या उपक्रमासाठी भोई प्रतिष्ठानचे मार्गदर्शक भूषण गोखले, आर. एम. श्रीधरन, ब्रिगेडियर विनोद कुमार, लेफ्टनंट कर्नल दलजीत सिंग तसेच हेमंत गोसावी, विजय घाणेकर, प्रमोद परदेशी, मनोज चौधरी आणि चंद्रकांत दोमा यांनी विशेष सहकार्य केले.

# विजय नंदागवळी सामाजिक चळवळीचे प्रवक्ता पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**भंडारा प्रतिनिधी** : जिल्ह्यातील साकोली तालुक्यात वास्तव्यात असलेल्या विजय नंदागवळी यांच्या फुले, शाहू,आंबेडकर चळवळीतील सामाजिक कार्याची, दखल घेऊन पहेला येथे सन्मान द्या व सन्मान घ्या या प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस सरचिटणीस संजीव भांबोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विविध सामाजिक क्षेत्रातील पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते, प्रबोधनकार, कवी, शासकीय कर्मचारी , अधिकारी , शाहीर, कलाक्षेत्र व इतर क्षेत्रांमध्ये हे उत्कृष्ट कार्य करतात .परंतु शासन स्तरावर त्यांची दखल घेतली जात नाही म्हणून अशा कार्यकर्त्यांची दखल व्हावी, त्यांच्या कार्याची कदर व्हावी , व त्यांना सन्मान मिळावा , व त्यांच्या कार्याला गती मिळावी या उदात्त हेतूने सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्याचा भव्य पुरस्कार सत्कार सोहळा सम्यक बुद्ध विहार पहेला येथील प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. विजय नंदागवळी मागील ३० वर्षापासून फुले, शाहू, आंबेडकर चळवळीत अग्रेसर असून त्यांच्या कार्याची पावती म्हणून






त्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र ,पुष्पगुच्छ , मानाचा फेटा देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी डॉ.खुशाल बोपचे माजी खासदार तथा राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघ , दैनिक माझा मराठवाडा तथा ज्ञानपंख न्यूज चॅनलचे चे मुख्य संपादक दशरथ सुरडकर ,फिल्म अभिनेता अश्विनकुमार वघाले, फिल्म अभिनेत्री चैताली भस्मे, अशोकराव सोनवणे फुले, शाहू ,आंबेडकर चळवळीतील ज्येष्ठ विचारवंत छत्रपती संभाजी नगर, माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्ण, ब्लू स्टार्म टीव्ही न्यूज चॅनलचे संपादक पत्रकार संजीव भांबोरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ , पुष्पगुच्छ ,मानाचा फेटा देऊन सन्मानित करण्यात आले .त्यांच्या या मिळालेल्या राज्यस्तरीय पुरस्काराबद्दल त्यांच्या अनेक च्या त्यांनी त्यांचे अभिनंदन केलेले आहे.

# महाराष्ट्रातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे महाअधिवेशन

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / रमेश औताडे** : महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी युनियनच्या वतीने राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी २० जून शनिवारी दुपारी २ वाजता छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील लाडगाव येथील आदिती लॉन्स येथे राज्यस्तरीय महाअधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती राज्य सचिव अशोक कुथे यांनी दिली.या महाअधिवेशनाला राज्यभरातील सुमारे ६० हजार ग्रामपंचायत कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती राज्य सचिव अशोक कुथे यांनी दिली. कर्मचाऱ्यांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या प्रश्नांवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आणि पुढील आंदोलनाची दिशा निश्चित करण्यासाठी हे अधिवेशन महत्त्वपूर्ण ठरणार आहे.अधिवेशनात ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करणे, बहुसंख्य कामगारांना डीसीपीएस योजनेअंतर्गत पेन्शन योजना लागू करणे, १० टक्के आरक्षणाबाबत नियमित भरती प्रक्रिया राबविणे, तसेच कर्मचाऱ्यांच्या इतर मागण्यांवर शासनाने मंजुरी देऊन त्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी, या प्रमुख मागण्यांवर चर्चा होणार आहे.या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह विविध मान्यवर येणार आहेत. राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी संघटित शक्तीचे प्रदर्शन घडवून आणण्याच्या उद्देशाने आयोजित या महाअधिवेशनात सर्व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी युनियनच्या वतीने करण्यात आले आहे. असे राज्य सचिव अशोक कुथे यांनी दिली.

# मंठा येथे ‘शिवसेना महिला तक्रार निवारण केंद्र’ व संपर्क कार्यालयाचे थाटात उद्घाटन! उदयसिंह बोराडे

**दैनिक युवक आधार**
**(विशेष प्रतिनिधी) : नामदेव मंडपे मंठा** : महिलांच्या अडीअडचणी व तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यासाठी मंठा शहरात ‘शिवसेना महिला तक्रार निवारण केंद्र’ आणि जनसंपर्क कार्यालयाचे भव्य उद्घाटन करण्यात आले आहे. या कार्यालयाच्या माध्यमातून तालुक्यातील महिलांच्या विविध प्रश्नांना व समस्यांना न्याय मिळवून दिला जाणार आहे.

हे कार्यालय शिवसेना नेते व मार्गदर्शक माजी मंत्री अर्जुनराव खोतकर, शिवसेना जिल्हाप्रमुख ए. जे. पाटील बोराडे आणि माजी सभापती प्रल्हादराव बोराडे यांच्या खंबीर मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आले आहे. या नवीन



शाखेचे अधिकृत उद्घाटन शिवसेना तालुकाप्रमुख उदयदादा बोराडे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. याप्रसंगी महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख कासाबाई शिरगुळे, महिला आघाडी तालुकाप्रमुख सुनिता ताई देशमुख, गयाअक्का पवार, व सर्व तालुक्यातील महिला आघाडी

या प्रसंगी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प करण्यात आला. मंठा येथील या नवनिर्वाचित केंद्राच्या अध्यक्षपदी श्रीमती रेखा शिरगोळे यांची नियुक्ती करण्यात आली असून, महिलांचे संघटन व त्यांच्या समस्या सोडवण्याची मुख्य जबाबदारी त्यांच्यावर असेल.

**महत्त्वाची माहिती व संपर्क:**

कार्यालयाचा पत्ता: शिवसेना कार्यालय, मार्केट यार्ड, मंठा, ता. मंठा, जि. जालना.

संपर्क क्रमांक: ७६६६०८८८२१ (7666088821).

आवाहन: मंठा परिसरातील महिलांनी आपल्या कोणत्याही समस्या, तक्रारी किंवा कायदेशीर मार्गदर्शनासाठी या संपर्क कार्यालयाशी किंवा थेट अध्यक्ष श्रीमती रेखा शिरगोळे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन शिवसेनेच्या वतीने करण्यात आले आहे. यावेळी भगवानराव गायकवाड, सतीश राव देशमुख, बाळासाहेब देशमुख, विनोद खरात, बंडू नाना बोराडे, भगवान बोराडे, माऊली वायाळ, पप्पू बोराडे,

## पाण्याअभावी अंधेरी-घाटकोपर लिंक रोडवरील दुभाजकातील झाडे सुकली

**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर, (केतन भोज)** ;घाटकोपर अंधेरी लिंक रोडवरील जागृती नगर ते साकीनाका जंक्शन दरम्यान असलेल्या दुभाजकावर एमएमआरडीए कडून सुशोभीकरणांतर्गत विविध प्रकारची शोभेची झाडे लावण्यात आली होती.या झाडांची पूर्ण क्षमतेने वाढही झाली,त्याकरिता या झाडांना वेळोवेळी पाणी देण्याचे काम महापालिकेच्या वतीने करण्यात आले होते.मात्र सध्या अनेक दिवसापासून या झाडांना पाणी न मिळाल्याने पाण्याअभावी ही झाडे सुकली असून अनेक झाडे पूर्णपणे जळून गेल्याचे चित्र आहे. अंधेरी घाटकोपर मेट्रोच्या कामादरम्यान या रस्त्यावरील दुभाजकाचे बांधकाम करून विविध प्रजातीची झाडे लावण्यात आली.



शिवाय या दुभाजकाला लोखंडी जाळीही बसविण्यात आली त्यामुळे त्याच्या सौंदर्यात आणखी भर पडली.रात्रीच्या वेळी समोरील वाहनाची लाईट चालकाच्या डोळ्यावर पडू नये,हवामानाचे संतुलन राखले जावे आणि त्या माध्यमातून शहराचे सौंदर्यीकरण व्हावे या उद्देशाने सदर दुभाजकाचे सौंदर्यीकरण करण्यात आले होते.मात्र गेले अनेक दिवसापासून या झाडांकडे महापालिकेने पूर्णतः दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

त्यामुळे सध्या या झाडांची अवस्था अत्यंत खराब झाली असून अनेक झाडे पाण्याअभावी सुकून गेली तर अनेक झाडे पूर्णपणे जळून गेल्याचे पाहायला मिळते.मुंबईचे तापमान आणि उष्णतेचा विचार करता या काळात झाडांना मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता होती.मात्र पालिकेने याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याने गेले कित्येक दिवस या झाडांना पाणी मिळाले नसल्याचे दिसून येते.त्यामुळे या झाडांची अवस्था अत्यंत बिकट झाली असून संबंधित यंत्रणेने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन या झाडांना वेळेवर पाणी उपलब्ध करून द्यावे अशी मागणी स्थानिक नागरिक आणि प्रवाशांकडून होत आहे

# मुंबई येथे " राष्ट्रीय कार्य दर्पण गौरव संमेलन संमेलन संपन्न"

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** "पुरस्कारा मुळे व्यक्तीच्या चांगल्या कामाची दखल घेतली जाते.त्यामुळे त्या व्यक्तीची ऊर्जा शतपटीने वाढते.भावी काळात आपल्या उत्तम कार्याचा आलेख उंचावण्याची त्यांना प्रेरणा प्राप्त होते."असे भावपूर्ण उदगार सुप्रसिद्ध संगीतकार कौशल इनामदार यांनी काढले.कार्य दर्पण युट्युब चॅनेल व महाराष्ट्र लोक कल्याणकारी सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने गआयोजित राष्ट्रीय कार्य दर्पण संमेलन व सन्मान पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी आयकर विभागाचे अतिरिक्त आयुक्त सुनिल आगावणे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, संस्था कार्य दर्पण पुरस्कारामुळे संपूर्ण महाराष्ट्राशी सुसंवाद साधते.

कर्करोग शास्त्रज्ञ डॉ.अमजद खान पठाण यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की

" संस्थेने हा स्तुत्य उपक्रम राबवून चांगले कार्य केले आहे.त्यामुळे पुरस्कारार्थींना प्रोत्साहन मिळून त्यांचे




मनोबल वाढते.त्यांची प्रगती होते." कार्यक्रमाचे प्रास्तविक करताना संस्थेचे संस्थापक एन.डी.खान यांनी सांगितले की, "पुरस्कारामुळे सेवाव्रतींना त्यांच्या चांगल्या कार्याची पोच-पावती मिळते. भावी पिढीस त्यांच्या उपक्रमाची जाणीव होते..समाज भूषण उत्तमराव तरकसे यांनी संस्थेने कार्य दर्पण पुरस्काराचे सातत्य ठेवल्याबद्दल अभिनंदन केले.

सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक कदम यांनी ओघवत्या भाषेत केले.तर पुरस्कार सोहळ्याचे निवेदन निवेदिका व साहित्यिका सौ.अनघा जाधव यांनी त्यांच्या खास शैलीने केले. महाराष्ट्रातील विविध भागातून आलेल्या पुरस्कार्थींना मान्यवरांच्या हस्ते शाल, सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्र राज्याच्या जलसंपदा विभागाचे विशेष अधीक्षक डॉ.जे.के.महाडिक, कोळी नटसम्राट राजेश खर्डे वेसावकर ,लोककला लोकनृत्य अभ्यासक, संशोधक व नृत्य दिग्दर्शक पंकज पाडाळे,लोकनृत्यनिपुण वेसावकर, बेन्ज Hospital चे चेअरमन डॉ.आबिद सय्यद , कार्टर रेस्टॉरंट चे चेअरमन मेहबूब खान, साहित्यिक व शीघ्र कवी प्रा.जमील कमील. इत्यादी मान्यवर उपस्थित होते.सौ.सलमा खान ह्या सदर कार्यक्रमाच्या प्रमुख आयोजक होत्या.

वेसावकर फेम तथा कोळी नटसम्राट राजेश खर्डे यांनी मी है कोळी या कोळी गीतावर पुरस्कारार्थी सोबत केलेले नृत्य व रोशन मोडकले यांच्या विद्यार्थ्यांना सादर केलेले नृत्य व तीन वर्षांच्या चिमुकली कु.बावनथडे हिने छत्रपती शिवाजी महाराजांचा केलेला जयजयकार कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले

डॉ.विजय मोरे यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. डॉ .ईसा शेख , विजय भोसले, शब्दश्री विलास देवळेकर, राजकुमार ताकमोगे,सौ. मीना ताकमोगे, प्रतिभा किर्तीकर्वे , गुलाब सलाट, इत्यादी संस्थेच्या कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले. शब्दश्री विलास देवळेकर यांचे" राष्ट्रीय कार्य दर्पण सन्मान पुरस्कार" या आद्य अक्षराने केलेल्या कवितेचे फ्लेक्स सर्वांचे लक्ष वेधत होते.

## मोदी सरकारच्या जनविरोधी धोरणांविरोधात काकरोज जनता पक्षाचा एल्गार; अश्विनी मेश्राम यांचा घणाघात

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे लाखनी :** केंद्रातील मोदी सरकारच्या कथित जनविरोधी आणि अपयशी धोरणांविरोधात काकरोज जनता पक्षाने आक्रमक भूमिका घेतली असून, पक्षाच्या समर्थक अश्विनी मेश्राम यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. "महागाई, बेरोजगारी आणि शेतकरी प्रश्नांवर सरकार पूर्णपणे अपयशी ठरले असून जनतेची दिशाभूल करण्याचे काम सुरू आहे," असा आरोप त्यांनी केला.

अश्विनी मेश्राम म्हणाल्या की, पेट्रोल-डिझेल, गॅस, जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे सर्वसामान्य नागरिकांचे कंबरडे मोडले आहे. युवकांना रोजगाराच्या नावाखाली केवळ



आश्वासने देण्यात आली, मात्र प्रत्यक्षात बेरोजगारीचा प्रश्न अधिकच गंभीर झाला आहे. शेतकरी, कामगार, महिला आणि वंचित घटकांच्या समस्यांकडे सरकारचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

"देशाच्या विकासाच्या नावाखाली मोठमोठ्या घोषणा केल्या जात आहेत; परंतु वास्तवात सामान्य नागरिक आर्थिक संकटात सापडला आहे. जनतेच्या प्रश्नांपासून लक्ष विचलित करण्यासाठी भावनिक मुद्दे पुढे केले जात आहेत," अशी टीकाही त्यांनी केली.

काकरोज जनता पक्ष जनतेच्या हक्कांसाठी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन उभारणार असून, सरकारच्या धोरणांविरोधात गावोगावी जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असल्याचे अश्विनी मेश्राम यांनी स्पष्ट केले. जनतेने अन्यायाविरोधात एकजूट होऊन आवाज उठवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

## नवघर ग्रामपंचायत हद्दीतील गावांना भेडसावणा-या समस्यांविषयी सिडको अधिका-यां समवेत ग्रामस्थांची बैठक सपन्न

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख एम.डी. भोईर :** मंगळवार दि.१६/०६/२०२६ रोजी सिडको द्रोणागिरी ऑफीस बोकडविरा येथे नवघर ग्रामपंचायत हद्दीतील नवघर,नवघरपाडा,आणि कुंडेगाव गावांमध्ये तसेच येथील नागरिकांना भेडसावणा-या समस्यांविषयी सिडको द्रोणागिरी नोड कार्यालयात या तिन्ही गावच्या ग्रामस्थांसोबत बैठकीचे आयोजन करण्यात आले असता येथील सिडको कार्यालयात जमलेल्या नवघर,नवघरपाडा आणि कुंडेगावच्या ग्रामस्थांनी आपल्या गावच्या आणि परिसरातील समस्यांचा पाढाच सदर सिडको अधिका-या समोर वाचून दाखवला. येथील नागरिकांनी अनेक मुलभूत सुविधा आणि आता पावसाळयात नव्याने उद्भवू शकणा-या समस्या सदर





सिडको अधिकारी संजय पाटील यांच्या समोर मांडल्या या मध्ये श्री.आसरा देवीच्या तलावाच्या सुशोभीकरणाचा तसेच पावसाळयात उद्भवणा-या आपत्कालीन समस्येवर सिडकोच्या अधिका-यां सोबत सकारात्मक चर्चा होऊन श्री आसरा देवी तलावाचे सुशोभीकरणासाठी ६ ते ७ लाखाचा निधी देण्याचे कबूल केले आहे. तसेच समाज मंदिर आणि व्यायामशाळा बांधण्यासही सिडको कडून निधी उपलब्ध करून देण्याचे मान्य केले असून नवघर गावातील इतर कामे जशी नवघर गावच्या आतील रोडचे काम तसेच घनकचरा उचलणे व त्या कच-याचे विल्हेवाट लावणे,इत्यादी कामे तसेच नवघर ग्रामपंचायत हद्दीतील गावांमध्ये आणि परिसरातील आवश्यक असणारी जनहिताची तसेच पावसाळयात अचानक उद्भवणारी कामेही करून देणार आसल्याचे सदर सिडकोचे अधिकारी मा.श्री.संजय पाटील यांनी सदर बैठकीला उपस्थीत असणा-या नवघर,नवघरपाडा आणि कुंडेगाव ग्रामस्थ आणि ग्रामपंचायत सदस्य यांच्या समोर कबूल केले असता येथील जमलेल्या ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

# ट्रॅक्टरमधून विद्यार्थ्यांची जल्लोषात मिरवणूक; जिल्हा परिषद शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** नवीन शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर दिनांक १५ जून २०२६ रोजी जिल्हा परिषद शाळेत प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला. इयत्ता पहिलीमध्ये नव्याने दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. यावेळी सजविलेल्या ट्रॅक्टरमधून विद्यार्थ्यांची गावातून भव्य प्रवेशोत्सव फेरी काढण्यात आली.

रंगीबेरंगी फुगे, आकर्षक सजावट आणि स्वागत फलकांनी सजलेल्या ट्रॅक्टरमध्ये बसलेल्या चिमुकल्यांनी गावातील नागरिकांना आनंदाने टाटा करत आपुलकीची भावना व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या निरागस हास्याने आणि उत्साहाने ग्रामस्थांची मने



जिंकली. संपूर्ण गावातून काढण्यात आलेल्या या फेरीमुळे प्रवेशोत्सवाला उत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले.

या कार्यक्रमास पंचायत समितीच्या शालेय शक्ती निर्माण योजनेचे अधीक्षक प्रशांत गायकवाड, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेश गव्हाणे, श्रीहरी बोचरे, सदाशिव बोचरे, पोलीस पाटील सुनील बोचरे, उपसरपंच लहानु पाटील मेमाने, विविध सहकारी सोसायटीचे चेअरमन शांताराम ढवळे, जय बाबाजी ड्रायव्हिंग स्कूल लासलगावचे संचालक गंगाधर गव्हाणे यांच्यासह भागवत बोचरे, संतोष घाडगे, शिवप्रसाद घाडगे, सचिन मेमाने, बाळकृष्ण पिंगट, फिरोज शेख, अजित बोचरे, नितीन लोहारकर, राहुल शिंदे, संभाजी डुकरे, वैभव लोहारकर, वजीर तांबोळी, आण्णा पाटील मेमाने, सोमनाथ पोटे, निहाल शेख, ग्रामपालिका सदस्या मथुराबाई बोचरे, योगिता शेटे, सुरेखा अढांगळे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेचे मुख्याध्यापक श्री. गावडे यांनी प्रास्ताविकातून प्रवेशोत्सवाचे महत्त्व विशद करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांनी शाळेशी सातत्याने संपर्क ठेवण्याचे आवाहन केले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत शिक्षणाच्या प्रवासासाठी प्रोत्साहन दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवनाथ सुरवाडे यांनी केले. प्रवेशोत्सव यशस्वी करण्यासाठी संदीप बोरसे, उज्वला देशमुख, नुतन शेटे, विद्या वाघ, देवयानी साळी, योगिता खैरनार, नीता वायळ तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

प्रवेशोत्सवाच्या निमित्ताने शाळेच्या परिसरात आनंदी आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. नव्या विद्यार्थ्यांनी आनंदाने शाळेत प्रवेश करत आपल्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवात केली. ग्रामस्थ, पालक आणि शिक्षकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रम संस्मरणीय ठरला.

## आष्टी गावातील विश्वदीप प्रमोद कांबळे पत्रकारिता पदव्युत्तर पदवी प्राप्त

**दैनिक युवक आधार**

**नांदेड प्रतिनिधी :** नांदेड जिल्हातील आष्टी गावचे युवा पत्रकार विश्वदीप प्रमोद कांबळे यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथून पत्रकारितेची पदव्युत्तर पदवी एम .ए .मास कम्युनिकेशन आणि जनेलिझम यशस्वी रित्या संपादक केली आहे विद्यापीठात पत्रकारिता व जनसंचार क्षेत्रातील उच्च शिक्षण पूर्ण करून यांन आपल्या गावाचे नाव उज्ज्वल केले आहे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड पत्रकारिता विषयातील पदव्युत्तर शिक्षणाची यवरथा उपलब्ध आहे आष्टी गावातून पत्रकारिता विषयात पदव्युत्तर पदवी प्राप्त केरणारे ते पहिले पत्रकार असल्याची माहिती ग्रामस्थांजानि यक केली आहे पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असताना सामाजिक प्रश्न ग्रामविकास पारदर्शक प्रशासन आणि जनहिताच्या विषयावर सातत्याने आवाज उडवणारे विश्वदीप प्रमोद कांबळे यांनी शिक्षणासोबतच सामाजिक बांधिलकीही जपली आहे यांचा या यशाबद्दल आष्टी ग्रामस्थ मित्र परिवार पारदर्शक प्रशासन आणि जनहिताच्या विषयावर सातत्यान आवाज उडवणारे विश्वदीप कांबळे यांनी शिक्षणासोबत सामाजिक बांधिलकीही जपली आहे याच्या या यशाबद्दल आष्टी ग्रामस्थ मित्र परिवार पत्रकार बांध व तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होती आहे भविष्यातही पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून समाजहितासाठी योगदान देण्याची अपेक्षा तक करण्यात येत विश्वदीप कांबळे यांनी या शैक्षणिक यशाबद्दल हार्दिक अभिनंदन



## चिंध्रण ग्रामपंचायतीचा स्तुत्य उपक्रम ; जिल्हा परिषद शाळेमध्ये पहिलीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांच्या घरपट्टीमध्ये 50% सवलत

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** पनवेल तालुक्यातील ग्रामपंचायतीने स्तुत्य उपक्रम राबवून जिल्हा परिषद शाळेमध्ये पहिलीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांच्या घरपट्टीमध्ये 50% सवलत देणार असल्याचे जाहीर केले आहे.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी जिल्हा परिषद शाळा चिंध्रण येथे इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेतलेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांचे भव्य आणि उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले.



मिरवणूक काढून, फुलांचा वर्षाव करत आणि शुभ पावलांचे ठसे घेऊन या विद्यार्थ्यांचा ज्ञानमंदिरात प्रवेश सोहळा मोठ्या आनंदात पार पडला.या प्रसंगी चिंध्रण गावचे सरपंच एकनाथ पाटील, उपसरपंच मनोज कुंभारकर, सदस्य जीवन पाडेकर, ग्रामविकास अधिकारी ईश्वर पवार, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सौ. जागृती पाटील , उपाध्यक्ष राम पाटील, शाळेचे मुख्याध्यापक जाधव सर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी पालकवर्ग आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पहिलीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांची घरपट्टीमध्ये 50 टक्के सवलत देण्याचे सरपंच एकनाथ नामदेव पाटील यांनी जाहिर केले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## नवीन पनवेल रेल्वे स्थानक परिसरातील बेकायदेशीर खाद्यपदार्थ विक्री व अस्वच्छतेविरोधात कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अन्नधान्य व औषधांमधील भेसळ करणाऱ्यांविरोधात कठोर भूमिका घेत विविध कारवाया सुरू केल्या आहेत. भेसळ करणाऱ्यांवर मकोका सारख्या कठोर कायद्यांतर्गत कारवाई करण्याचे पाऊल उचलल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. मात्र, दुसरीकडे नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित प्रश्न निर्माण करणाऱ्या बेकायदेशीर खाद्यपदार्थ विक्रेत्यांवर कारवाई कधी होणार, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.





नवीन पनवेल रेल्वे स्थानक परिसरातील मंगलमूर्ती रोज बाजार परिसरात अनेक फेरीवाले आणि टपरीधारक कोणताही अधिकृत महापालिका परवाना नसताना खाद्यपदार्थांची विक्री करत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. तसेच अनेक विक्रेते फूटपाथवर स्टॉल उभारून व्यवसाय करत असल्याने पादचाऱ्यांना चालण्यासाठी मोकळी जागा उपलब्ध राहत नसल्याची तक्रार आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या परिसरात वारंवार तक्रारी करण्यात आल्या असून स्थानिक वृत्तपत्रांमध्येही यासंदर्भात बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. तरीही संबंधित यंत्रणांकडून प्रभावी कारवाई होत नसल्याचा आरोप केला जात आहे. काही स्थानिक लोकप्रतिनिधींच्या आश्रयामुळे हे बेकायदेशीर व्यवसाय सुरू असल्याचीही चर्चा परिसरात रंगत आहे.

याशिवाय, परिसरातील गटारींमध्ये कचरा व घाण टाकली जात असल्याने मोठ्या प्रमाणावर अस्वच्छता निर्माण झाली आहे. यामुळे दुर्गंधी, डासांची वाढ आणि सार्वजनिक आरोग्याच्या समस्या निर्माण होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. पनवेल महापालिकेकडून नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर मालमत्ता कर आकारला जात असताना मूलभूत सुविधा आणि मोकळे फूटपाथ उपलब्ध होत नसल्याबद्दलही नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

नागरिकांनी अन्न व औषध प्रशासन विभाग तसेच पनवेल महानगरपालिका यांनी संयुक्तपणे या परिसराची पाहणी करून बेकायदेशीर टपऱ्या, विनापरवाना खाद्यपदार्थ विक्री, संभाव्य भेसळयुक्त अन्नपदार्थांची तपासणी आणि अस्वच्छते विरोधात तातडीने कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. तसेच सार्वजनिक आरोग्य आणि नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने संबंधितांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने पशुवैद्यकीय डॉ.संदीप शिंदे यांना पुरस्कार जाहीर

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी :- मारुती सत्रे** : आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने पशुवैद्यकीय क्षेत्रातील अत्यंत मान्यवर, कर्तव्यदक्ष, अभ्यासू, सेवाभावी आणि शेतकरी-पशुपालकांच्या मनातील विश्वासार्ह नाव असलेल्या डॉ. संदीप शिंदे सर साहेब यांना राज्यस्तरीय "महाराष्ट्र आयकॉन 2026" हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा.

समाजात अनेक क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती असतात; मात्र मुक्या प्राण्यांच्या सेवेसाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित करणाऱ्या व्यक्ती फारच कमी असतात. अशा व्यक्तींमध्ये डॉ. संदीप शिंदे सर यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. त्यांनी पशुवैद्यकीय क्षेत्रात केलेले कार्य, पशुपालकांना दिलेले मार्गदर्शन, जनावरांच्या आरोग्यासाठी घेतलेली मेहनत आणि ग्रामीण भागातील शेतकऱ्यांशी जपलेले आत्मीय नाते यामुळे त्यांना हा पुरस्कार प्राप्त होणे म्हणजे त्यांच्या कार्याचा योग्य सन्मान आहे.

पशुधन हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मानले जाते. अनेक शेतकरी कुटुंबांचा उदरनिर्वाह हा शेतीसोबत पशुपालनावर अवलंबून असतो. अशा परिस्थितीत जनावरांचे आरोग्य चांगले राहणे अत्यंत महत्त्वाचे असते. या जबाबदारीची जाणीव ठेवून डॉ. संदीप शिंदे सर यांनी दिवस-रात्र न पाहता पशुधनाच्या आरोग्य संवर्धनासाठी अथक परिश्रम घेतले. अनेकदा सुट्टीच्या दिवशी, मध्यरात्री किंवा प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी पशुपालकांच्या हाकेला प्रतिसाद देत जनावरांचे प्राण वाचविण्यासाठी धाव घेतली आहे.



त्यांच्या कार्यामध्ये केवळ उपचारच नाहीत, तर पशुपालकांचे प्रबोधन, आधुनिक पशुपालन तंत्रज्ञानाची माहिती, रोगप्रतिबंधक उपाययोजना, लसीकरण मोहिमा, दुग्ध व्यवसायातील सुधारणा, पशुखाद्य व्यवस्थापन आणि जनावरांच्या उत्पादकतेत वाढ करण्यासाठी सातत्याने मार्गदर्शन यांचाही समावेश आहे. त्यामुळे हजारो पशुपालकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून आला आहे.

डॉ. शिंदे सर यांचे व्यक्तिमत्त्व हे ज्ञान, अनुभव, संवेदनशीलता आणि सेवाभाव यांचे सुंदर मिश्रण आहे. पशुवैद्यकीय क्षेत्रातील नवीन संशोधन, आधुनिक तंत्रज्ञान आणि बदलत्या गरजांनुसार स्वतःला अद्ययावत ठेवत त्यांनी आपल्या कार्यात सातत्याने गुणवत्ता जपली आहे. त्यामुळेच शेतकरी, पशुपालक, सहकारी अधिकारी आणि समाजातील विविध घटक त्यांच्याकडे आदराने पाहतात.

आजच्या युगात यश मिळविण्यासाठी केवळ पद किंवा अधिकार पुरेसा नसतो; त्यासाठी प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, लोकांशी असलेली बांधिलकी आणि समाजहिताची भावना आवश्यक असते. डॉ. संदीप शेठ शिंदे यांनी या सर्व गुणांचा आदर्श नमुना आपल्या कार्यातून समाजासमोर ठेवला आहे. त्यांनी केलेल्या कार्यामुळे अनेक कुटुंबांचे आर्थिक नुकसान टळले, पशुधनाचे संरक्षण झाले आणि पशुपालन व्यवसायाला नवी दिशा मिळाली.

"महाराष्ट्र आयकॉन 2026" हा पुरस्कार त्यांच्या यशाची केवळ एक पायरी आहे. हा सन्मान त्यांच्या अनेक वर्षांच्या अथक परिश्रमांचा, समर्पणाचा आणि समाजसेवेच्या भावनेचा गौरव आहे. हा पुरस्कार मिळाल्यामुळे पशुवैद्यकीय क्षेत्रात कार्य करणाऱ्या इतरांना देखील प्रेरणा मिळणार असून सेवाभावी कार्याला नवे बळ प्राप्त होणार आहे.

आमच्यासाठी डॉ. संदीप शेठ हे केवळ एक यशस्वी पशुवैद्यकीय अधिकारी नाहीत, तर ते मार्गदर्शक, प्रेरणास्थान आणि पशुपालकांच्या हितासाठी सदैव झटणारे खरे समाजसेवक आहेत. त्यांच्या विचारांमधून, कार्यपद्धतीतून आणि जनसेवेच्या भावनेतून अनेकांना प्रेरणा मिळत आहे. त्यांचे योगदान भविष्यातही अशाच प्रकारे समाजाच्या प्रगतीसाठी मोलाचे ठरत राहील, याबद्दल कोणतीही शंका नाही.

आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने आम्ही त्यांच्या या उल्लेखनीय यशाचा मनापासून गौरव करतो. पशुसेवा, शेतकरी हित आणि समाजकल्याणासाठी त्यांनी केलेले कार्य भविष्यातही अधिक व्यापक स्वरूपात वाढत राहो, त्यांच्या हातून अशीच लोकहिताची सेवा घडत राहो आणि त्यांना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरही सन्मान मिळत राहोत, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

डॉ. संदीप शेठ शिंदे साहेब यांना राज्यस्तरीय महाराष्ट्र आयकॉन 2026पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल पुन्हा एकदा हार्दिक अभिनंदन! त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आणि निरंतर समाजसेवेसाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

## जलजीवन योजनेच्या कामावर सणसर ग्रामस्थांची कूचबंणा

### निविदेप्रमाणे काम होत नसल्याचा तक्रारी करून सुद्धा अधिकारी गप्प का ?

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : सणसर ता.इंदापूर गावातील जलजीवन मिशन योजनेच्या कामाबाबत ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून,गावातील पाईपलाईनचे काम मंजूर निविदेप्रमाणे होत नसल्याची तक्रार माहिती अधिकार समितीचे इंदापूर तालुकाध्यक्ष विकास क्षत्रिय यांनी केली आहे.क्षत्रिय यांनी सांगितले की,जलवाहिनी टाकताना निविदेमध्ये नमूद केलेल्या खोलीनुसार (डीप) खोदकाम करण्यात आलेले नसून, भविष्यात या योजनेचा दीर्घकालीन लाभ ग्रामस्थांना मिळणार नाही.गावातील साठवण तलावाचे काम अद्याप अपूर्ण असताना ठेकेदाराने वितरिका पाईप टाकण्याची घाई का केली जात आहे,असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.याशिवाय साठवण पाणी टाकीचे कामदेखील निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. टाकीच्या बाहेरील बाजूस गळती (लिकेज) काढण्यात आल्यामुळे या टाक्या दीर्घकाळ टिकू शकणार नाहीत,अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे.त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून कामाची पाहणी करावी आणि हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधित ठेकेदाराला निविदेतील अटींनुसार काम करण्याच्या सूचना द्याव्यात,अशी मागणी विकास क्षत्रिय यांनी केली आहे.



सणसर ग्रामपंचायत हद्दीत काम सुरू असतानाही प्रशासक अथवा ग्रामविकास अधिकारी सचिन पवार यांना काम सुरू असल्याची अथवा कामाच्या प्रगतीची पुरेशी माहिती दिली जात नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे.त्यामुळे संबंधित ठेकेदार मनमानी पद्धतीने निकृष्ट दर्जाचे काम करत आहे का,याची स्वतंत्र चौकशी होणे आवश्यक असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.दरम्यान मागील वर्षी पालखी सोहळा गावात येण्यापूर्वी मुख्य पेठेतील रस्ता उकरून मोठे नुकसान करण्यात आले होते. त्याची भरपाई आजपर्यंत ग्रामपंचायतीला देण्यात आले नसल्यामुळे ग्रामपंचायत आणि गावकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागल्याची चर्चा गावात आजही सुरू आहे.यंदाही पालखी सोहळयाच्या तोंडावरच गावातील मुख्य रस्ते फोडून काम सुरू करण्यात आल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली असून,याबाबत तीव्र चर्चा रंगू लागली आहे.

जलजीवन मिशन योजनेतील कामांची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करावी आणि गावकऱ्यांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून द्याव्यात,अशी मागणी तालुका अध्यक्ष विकास क्षत्रिय आणि सणसर ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## श्री छत्रपती सहकारी साखर कारखाना परिसरातील अंतर्गत रस्त्यांची पाहणी

### तुकाराम महाराज पालखीपूर्वी काम पूर्ण करण्याच्या सूचना

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : श्री छत्रपती सहकारी साखर कारखाना भवानीनगर परिसरात सुरू असलेल्या अंतर्गत रस्त्यांच्या कामांची पाहणी करण्यासाठी कारखान्याचे चेअरमन पृथ्वीराज बापू जाचक यांच्या नेतृत्वाखाली संचालक मंडळ व संबंधित अधिकाऱ्यांनी संयुक्त भेट देत कामांचा आढावा घेतला.

यावेळी संचालक शिवाजीराव निंबाळकर,पृथ्वीराज घोलप, अनिल काटे,प्रशांत दराडे ठेकेदार विराज अवताडे साहेब सार्वजनिक बांधकाम विभाग भिगवणचे अधिकारी तुपे साहेब,कामगार नेते युवराज रणवरे,सिव्हिल इंजिनियर नंदकुमार चांदगुडे,सागर निंबाळकर,इलेक्ट्रिशियन विभागाचे डोंगरे साहेब,अमोल निंबाळकर,संजय मुळीक जाधव साहेब आदी मान्यवर उपस्थित होते.



पाहणी दरम्यान कारखाना परिसरात नुकतीच सुरू झालेली शाळा लक्षात घेऊन विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शाळेसमोरील रस्त्यावर तातडीने गतिरोधक बसविण्यात यावेत,अशी सूचना करण्यात आली.तसेच पुढील महिन्यात संत तुकाराम महाराज पालखी सोहळा परिसरातून जाणार असल्याने त्या आधी अंतर्गत रस्त्यांची अपूर्ण कामे पूर्ण करून वाहतुकीसाठी रस्ते सुस्थितीत उपलब्ध करून द्यावेत,असे निर्देश संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांना देण्यात आले.

रस्त्यांच्या कामांबाबत असलेल्या विविध अडचणी, तांत्रिक बाबी आणि नागरिकांच्या अपेक्षा यावरही पाहणी दरम्यान चर्चा करण्यात आली.संचालक पृथ्वीराज घोलप शिवाजीराव निंबाळकर अनिल काटे प्रशांत दराडे यांनी कामांच्या गुणवत्तेसह गती वाढविण्याची गरज व्यक्त केली.यावेळी ठेकेदार विराज अवताडे साहेब तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे तुपे साहेब यांना उर्वरित कामे नियोजित वेळेत पूर्ण करून रस्त्यांबाबतच्या सर्व अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.चेअरमन पृथ्वीराज बापू जाचक यांनी कारखाना परिसरातील रस्ते हे कामगार,विद्यार्थी,शेतकरी,व्यापारी व नागरिकांच्या दैनंदिन वापरासाठी महत्त्वाचे असल्याचे सांगत कामात कोणताही विलंब होऊ नये,अशी अपेक्षा व्यक्त केली. पालखी सोहळ्यापूर्वी सर्व कामे दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यावर भर देण्यात येणार असल्याची ग्वाही ठेकेदार व अधिकारी यांनी दिली या पाहणीमुळे सुरू असलेल्या विकासकामांना गती मिळणार असून परिसरातील सभासद व नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

## लोकनेते बाबुरावजी मडावी यांचा स्मृतिदिन आदिवासी समाजासाठी प्रेरणादायी – मधुसूदन कोवे गुरुजी

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : आदिवासी समाजातील "हृदयसम्राट" म्हणून ओळखले जाणारे लोकनेते स्वर्गीय बाबुरावजी मडावी यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेली "आदिवासी विचार मंथन सभा" उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या प्रसंगी ग्राम स्वराज्य महामंचाचे अध्यक्ष मधुसूदन कोवे गुरुजी यांनी स्व. बाबुरावजी मडावी यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, "समतावादी, समाजवादी, त्यागी आणि कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व असलेले बाबुरावजी मडावी यांच्यासारखे नेतृत्व आदिवासी समाजात दुर्मिळ आहे. त्यांची दूरदृष्टी आणि समाजहिताची भूमिका आजही प्रेरणादायी आहे."



आदिवासी सांस्कृतिक भवन येथे झालेल्या या सभेचे अध्यक्षस्थान कोलाम समाज विचार मंच, यवतमाळचे अध्यक्ष श्रावणजी पाडसेनेकुन यांनी भूषविले, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. मनोहरजी मेश्राम उपस्थित होते. माजी नगर परिषद सभापती नंदुभाऊ कुडमथे यांचीही विशेष उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात डॉ. विलास कनाके यांनी स्व. बाबुरावजी मडावी यांच्या सामाजिक योगदानाचा आढावा घेतला. त्यांनी सांगितले की, मडावी यांनी आदिवासी विकास परिषदेची स्थापना करून समाजाच्या संघटनात्मक बळकटीसाठी कार्य केले. गडचिरोली जिल्ह्याच्या विकासात त्यांच्या योगदानामुळे त्यांना त्या जिल्ह्याचे शिल्पकार मानले जाते. त्यांनी समाजात एकोपा, मानवता आणि समतेची भावना जोपासली. आज समाजात वाढत असलेल्या गटबाजी व द्वेषपूर्ण राजकारणाबद्दल खंत व्यक्त करत त्यांनी समाजाने पुन्हा एकदा एकात्मतेचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन केले.

अध्यक्षीय भाषणात श्रावणजी पाडसेनेकुन यांनी कोलामी भाषेतून समाजबांधवांना समतेचा आणि ऐक्याचा संदेश दिला. त्यांनी कार्यक्रमाच्या आयोजनाचे कौतुक करताना मधुसूदन कोवे गुरुजी यांच्या समाजजागृतीच्या कार्याचे विशेष अभिनंदन केले. "तुम्ही समाजाला सातत्याने योग्य दिशा देत आहात. माझ्यासारख्या व्यक्तीला अध्यक्षपदाची संधी दिल्याबद्दल मी आयोजकांचा ऋणी आहे," असे त्यांनी नमूद केले.

सभेत उपस्थित मान्यवरांनी आदिवासी समाजाच्या वर्तमान परिस्थिती, सामाजिक ऐक्य, शिक्षण, नेतृत्व आणि विकासाच्या विविध विषयांवर सखोल विचारमंथन केले. समाजातील कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते, महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मधुसूदन कोवे गुरुजी, डॉ. विलास कनाके, प्रा. मनोहरजी मेश्राम, श्रावणजी पाडसेनेकुन, नंदुभाऊ कुडमथे, बंडूजी पंधरे, प्रदीप कुमरे, वसंतराव मडावी, महादेव कोडापे, देवानंद मडावी, प्रल्हाद काळे, विश्वास कुभेकर यांच्यासह अनेक समाजसेवकांनी मोलाचे सहकार्य केले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन वसंतराव मडावी यांनी केले. आदिवासी समाजाच्या एकात्मतेचा, समतेचा आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देणारी ही विचारमंथन सभा यशस्वीरित्या संपन्न झाली.

## इसम बेपत्ता

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, प्रतिनिधी** : खांदेश्वर रेल्वे स्थानकातून चालत्या ट्रेनमधून उतरुन एक इसम कुठेतरी निघून गेला तो अद्याप घरी न परतल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल रेल्वे पोलीस ठाणे येथे करण्यात आली आहे.विशाल कुमार खांडेकर (33 रा.सांगली) उंची 5 फुट 4 इंच, अंगाने सडपातळ, चेहरा उभट, रंगाने गोरा, नाक सरळ, केस काळे असून अंगात निळ्या रंगाचा हाफ शर्ट व निळ्या रंगाची जिन्स पॅन्ट घातलेली आहे. तसेच अंगावर पांढऱ्या रंगाचे डाग (कोड) असून सदर इसम मानसिक रुग्ण आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास



त्यांनी पनवेल रेल्वे पोलीस ठाणे 27467122 किंवा म.पो.हवा.बोराटे मो.नं.9821425404 येथे संपर्क साधावा.

## औद्योगिक प्रदूषणावर संशोधन; शक्ती केराम यांना विद्यावाचस्पती पदवी

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपुर** : "महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रातील व्यक्तींच्या केस व नखांच्या नमुन्यांमधील सूक्ष्म मूलद्रव्ये आणि जड धातूंचे जैविक परीक्षण" या महत्त्वपूर्ण विषयावर संशोधन प्रबंध सादर करून संशोधक शक्ती केराम यांना गोंडवाना विद्यापीठ तर्फे विद्यावाचस्पती (Ph.D.) पदवी प्रदान करण्यात आली आहे. औद्योगिक प्रदूषणाचा मानवी आरोग्यावर होणारा परिणाम अभ्यासणारे हे संशोधन शैक्षणिक क्षेत्रात विशेष लक्षवेधी ठरत आहे.या संशोधन कार्यासाठी डॉ. जी. डी. देशमुख यांनी मार्गदर्शक म्हणून मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच डॉ. हेमंत सपकाळ यांचेही



संशोधन प्रक्रियेत महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले.संशोधन कार्याचे यश मार्गदर्शक डॉ. प्राचार्य देशमुख सर,आई, पत्नी, बहीण, भाऊ तसेच कुटुंबीयांच्या पाठबळामुळे शक्य झाल्याची भावना शक्ती केराम यांनी व्यक्त केली.शक्ती केराम यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल मार्गदर्शक,आई,पत्नी, बहीण,भाऊ यांच्यासह राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. औद्योगिक प्रदूषण आणि मानवी आरोग्य यातील संबंध स्पष्ट करणारे हे संशोधन भविष्यात पर्यावरणीय व आरोग्यविषयक अभ्यासासाठी दिशादर्शक ठरणार असल्याची भावना मान्यवरांनी व्यक्त केली.

# "शुभम जोशी यांच्या कार्यकाळाची उच्चस्तरीय चौकशी करा,अन्यथा जनआंदोलन उभारू" – राम पाटील डोरले

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम येथील माजी कार्यकारी अभियंता शुभम जोशी यांच्या कार्यकाळात झालेल्या विविध विकासकामांची, बांधकाम प्रकल्पांची, आर्थिक व्यवहारांची तसेच गुणवत्ता नियंत्रण प्रक्रियेची उच्चस्तरीय आणि निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी जोरदार मागणी आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष राम पाटील डोरले यांनी महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रधान सचिवांकडे लेखी तक्रारीद्वारे केली आहे. या तक्रारीमुळे सार्वजनिक बांधकाम विभागातील कामकाज आणि विकासकामांच्या गुणवत्तेबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून जिल्ह्यातील राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात या प्रकरणाची मोठी चर्चा सुरू झाली आहे.

आम आदमी पार्टीच्या वतीने सादर करण्यात आलेल्या निवेदनात वाशिम जिल्ह्यातील विविध विकासकामांबाबत नागरिक, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि संबंधित घटकांकडून सातत्याने तक्रारी प्राप्त होत असल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. अनेक ठिकाणी करण्यात आलेल्या विकासकामांच्या दर्जाबाबत गंभीर शंका उपस्थित करण्यात आल्या असून, कामे नियमानुसार आणि तांत्रिक निकषांचे पालन करून करण्यात आली का याची स्वतंत्र तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, सार्वजनिक निधीतून उभारण्यात आलेल्या विविध प्रकल्पांमध्ये गुणवत्ता नियंत्रणाची यंत्रणा प्रभावीपणे राबविण्यात आली का, कामांचे मोजमाप, तपासणी आणि मंजुरी प्रक्रिया पारदर्शक होती का, याची चौकशी आवश्यक असल्याचे म्हटले आहे. विकासकामांवर कोट्यवधी रुपयांचा खर्च होत असताना नागरिकांना दर्जेदार सुविधा मिळणे अपेक्षित असते. मात्र अनेक कामांबाबत निकृष्ट दर्जाच्या तक्रारी समोर आल्याने शासनाने याची गंभीर दखल घ्यावी, असे डोरले यांनी निवेदनात नमूद केले आहे.

याशिवाय काही कंत्राटदार आणि संबंधित व्यक्तींनी कार्यालयीन कामकाजादरम्यान अपमानास्पद वागणूक मिळाल्याच्या तक्रारी केल्याचा उल्लेखही करण्यात आला आहे. बिल मंजुरी, देयक वितरण आणि प्रशासकीय प्रक्रियेदरम्यान कथित आर्थिक अनियमितता झाल्याचे आरोप करण्यात आले असून काही प्रकरणांमध्ये टक्केवारीची मागणी झाल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या आरोपांची सत्यता शोधण्यासाठी सक्षम आणि स्वतंत्र चौकशी समिती नेमून संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष तपासणी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, संत सेवालाल



महाराज पोहरादेवी विकास आराखड्यांतर्गत करण्यात आलेल्या विविध विकासकामांचाही या तक्रारीत उल्लेख करण्यात आला आहे. या कामांबाबत यापूर्वी विधिमंडळात प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. त्यामुळे या प्रकल्पांमध्ये झालेल्या कामांची गुणवत्ता, खर्च, प्रशासकीय मान्यता आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यांची स्वतंत्र चौकशी करणे आवश्यक असल्याचे आम आदमी पार्टीने म्हटले आहे.राम पाटील डोरले

## सार्वजनिक बांधकाम विभागातील कथित अनियमिततेवर आम आदमी पार्टी आक्रमक; विकासकामे, आर्थिक व्यवहार, गुणवत्ता नियंत्रण आणि मालमत्तेच्या चौकशीची मागणी!

**"सार्वजनिक बांधकाम विभागातील कथित अनियमिततेची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात आली नाही, तर आम आदमी पार्टीच्या वतीने जिल्हाभर जनजागृती मोहीम, तीव्र आंदोलन आणि लोकशाही मार्गाने जनआंदोलन उभारण्यात येईल. शासनाने या प्रकरणाकडे दुर्लक्ष केल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील."**

**– राम पाटील डोरले**
**जिल्हाध्यक्ष, आम आदमी पार्टी, वाशिम**

यांनी आपल्या निवेदनात आणखी एक गंभीर मुद्दा उपस्थित केला आहे. संबंधित अधिकाऱ्यांची बदली झाल्यानंतरही ते कार्यालयीन कामकाजात अप्रत्यक्षपणे सहभागी असल्याचे दिसून येत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. त्यामुळे चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांना कोणत्याही संवेदनशील पदावर नियुक्ती देऊ नये तसेच त्यांच्या कार्यकाळात मंजूर व पूर्ण झालेल्या सर्व विकासकामांचे तांत्रिक आणि आर्थिक लेखापरीक्षण करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या मालमत्ता, आर्थिक व्यवहार आणि उत्पन्नाच्या स्रोतांचीही सखोल चौकशी करण्यात यावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

चौकशीत कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार, आर्थिक अपहार अथवा पदाचा गैरवापर आढळल्यास संबंधितांविरुद्ध प्रशासकीय, शिस्तभंग तसेच फौजदारी स्वरूपाची कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आम आदमी पार्टीने केली आहे.या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई झाल्यास शासनाच्या पारदर्शकतेवरील विश्वास अधिक दृढ होईल आणि सार्वजनिक निधीचा योग्य वापर सुनिश्चित होईल, असा विश्वासही राम पाटील डोरले यांनी व्यक्त केला आहे.

# सरसकट कर्जमाफी द्या !' ; सारोळ्यात कर्जमुक्तीच्या जीआरची होळी

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर :** बुलढाणा येथे शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी सुरू केलेल्या आमरण उपोषणाला पाठिंबा दर्शवत, सारोळा( ता. सिल्लोड )येथे क्रांतिकारी शेतकरी संघटना व गावकऱ्यांच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६" च्या शासन निर्णयाची (जीआर) होळी करून तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.

शासनाने जाहीर केलेली ही कर्जमाफी सर्व शेतकऱ्यांना न्याय देणारी नसून, त्यातील जाचक अटींमुळे अनेक पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहणार असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. शासनाने हे जाचक नियम तात्काळ रद्द करून सर्व शेतकऱ्यांना सरसकट कर्जमुक्ती



**•आंदोलनातील प्रमुख मागण्या•**

**•जाचक अटी रद्द करा: कर्जमुक्ती योजनेतील शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या अटी त्वरित रद्द कराव्यात.**

**•सरसकट कर्जमुक्ती: निवडक निकषांऐवजी सर्व पात्र शेतकऱ्यांना सरसकट कर्जमुक्तीचा लाभ द्यावा.**

**•आंदोलनाचा इशारा: शासनाने मागण्यांची दखल न घेतल्यास राज्यभर आंदोलन तीव्र करण्यात येईल.**


द्यावी आणि शेतकरी हिताचे निर्णय घ्यावेत, अशी मागणी यावेळी करण्यात आली. शासनाने मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास बुलढाणा येथील आंदोलनाला पाठिंबा देत राज्यभर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.यावेळी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे प्रसाद पाटील वराडे, सरपंच मोहन गायकवाड, उपसरपंच नारायण वराडे, गणेश पाटील काकडे, दादाराव समिंद्रे, इम्रान काजी, ज्ञानेश्वर वराडे, अमोल पाटील काकडे, राजू पाटील वराडे, संदीप साळवे, भगवान वराडे, बबन वराडे, गणेश बाबुराव वराडे, राजू लव्हाळे, संतोष काळे, गजानन गोरे, समाधान वराडे, भाऊसाहेब वराडे, सागर साखळे, गजानन साखळे, विठ्ठल वराडे, योगेश काकडे आदींसह सिल्लोड तालुक्यातील व सारोळा गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय ॲथलेटिक्स: अजिंठ्याच्या उमेश तमखानेची रौप्यपदकावर मोहोर

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सुरत येथील वीर नर्मद साऊथ गुजरात युनिव्हर्सिटीच्या मैदानावर मंगळवारी पार पडलेल्या 'इंडियन ॲथलेटिक्स सिरीज-१२' स्पर्धेत अजिंठा येथील धावपटू उमेश कैलास तमखाने याने नेत्रदीपक कामगिरी केली आहे. २० वर्षांखालील पुरुष गटात ८०० मीटर धावण्याच्या शर्यतीत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत त्याने रौप्य पदक पटकावले.

अत्यंत चुरशीच्या या शर्यतीत उमेशने २ मिनिटे ११




सेकंद २७ शतांश (२:११:२७) इतक्या वेळेत अंतर पूर्ण करत द्वितीय क्रमांक पटकावला. अजिंठा येथील महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयात बी.एस्सी. प्रथम वर्षात शिकणाऱ्या उमेशने आपल्या जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे.

त्याच्या या यशाबद्दल राजर्षी शाहू संस्थेचे सचिव डॉ. राहुल पालोदकर, यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पंडित,महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य मनोज देशमुख, प्रा. डॉ. गोपीनाथ डापके, पाटील, भाऊसाहेब जंगले, संजय पायघन, सचिन पालोदकर, प्रा. एकनाथ जंजाळ, प्रा. कानबा घोंगडे, प्रा. किरण मोरे, प्रा. अनंत बुलबुले, कृष्णा गवळी, दर्शन मंडावरे, दिनेश दसरे तसेच मित्रमंडळ आणि ग्रामस्थांनी अभिनंदन करून त्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# कृउबासचे नवनिर्वाचित उपसभापती विजयराव राहणे यांचा सत्कार !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/प्रतिनिधी:** स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापतीपदी नुकतीच निवड झालेले मा.श्री. विजयराव राहणे यांचा मराठा सेवा संघ आकोटच्या वतीने नुकताच एका शानदार सोहळ्यात भावपूर्ण सत्कार करण्यात आला. शिवश्री सुरेशदादा कराळे आणि मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष शिवश्री राममूर्ती वालसिंगे यांच्या हस्ते राहणे यांना सन्मानित करण्यात आले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाला कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती शिवश्री अतुल खोटरे, संचालक बाबा पाटील जायले, तसेच श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्थेचे विश्वस्त नंदकिशोर हिंगणकर प्रामुख्याने उपस्थित होते. या



सर्व मान्यवरांनी विजयराव राहणे यांच्या नेतृत्वाचे कौतुक करत, त्यांच्या मार्गदर्शनाखाली बाजार समितीचा कारभार अधिक लोकाभिमुख होईल, असा विश्वास व्यक्त केला.

सत्कार सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी किसान ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष शिवश्री प्रा. वाल्मिक भगत आणि शिवश्री दिपक पाटील वानखडे यांनी विशेष परिश्रम घेतले. याप्रसंगी परिसरातील अनेक कार्यकर्ते आणि मराठा सेवा संघाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सोहळ्यामुळे आकोट परिसरातील राजकीय आणि सामाजिक वर्तुळात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# सिल्लोडमध्ये सागवान लाकडावर वनविभागाची धडक कारवाई; २ लाखांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : गुप्त माहितीच्या आधारे वनविभागाने सिल्लोड शहरालगतच्या आव्हाना रोड परिसरात धडक कारवाई करत, अवैधरित्या साठवून ठेवलेले सागवान प्रजातीचे लाकूड जप्त केले. या कारवाईत सुमारे आठ टन सागवान लाकूड आणि अंदाजे २ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, संबंधित व्यक्तीविरुद्ध वनगुन्हा नोंदविण्यात आला आहे.

वनविभागाच्या पथकाने सोमवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास आव्हाना रोड परिसरात छापा टाकला. तपासणीदरम्यान मोठ्या प्रमाणात



सागवान लाकडाचा साठा आढळून आला . प्राथमिक चौकशीअंती हा साठा सत्तार खान इस्माईल खान याचा असल्याचे निष्पन्न झाले. वनविभागाने तातडीने जप्तीची कारवाई करत संबंधित इसमावर वनगुन्हा दाखल केला.

जप्त करण्यात आलेला आठ टन लाकूडमाल आयशर वाहनाद्वारे शासकीय डेपोमध्ये सुरक्षितरित्या जमा करण्यात आला आहे. याप्रकरणी जप्ती पंचनामा व इतर कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून, पुढील तपास वनविभाग करत आहे.

ही कारवाई मुख्य वनसंरक्षक प्रमोद चंद लाकरा, उपवनसंरक्षक सुवर्णा माने, सहाय्यक वनसंरक्षक स्वप्नील भामरे आणि वनपरिक्षेत्र अधिकारी यशपाल दिलपाक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

यामध्ये वनपाल रेखा बरबडे, वनरक्षक साईनाथ पवार, गणेश परदेशी, अजीम शेख, विशाल जाधव, अनिल इंगळे आणि वाहन चालक विलास नरवाडे यांनी सहभाग घेतला. या मोहिमेत सिल्लोड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शामसुंदर कोठाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल आनंद पगारे व भूषण चौधरी यांनी सहकार्य केले. या कारवाईमुळे अवैध वृक्षतोड व लाकूड साठवणूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

# नगरसेवक हा फुटबॉलपटूप्रमाणे; त्याला फॉरवर्ड आणि डिफेंडर दोन्ही भूमिका निभवाव्या लागतात –मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपुर :** भारतीय जनता पार्टीच्या "पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान – २०२६" अंतर्गत आयोजित नागपूर महानगर नगरसेवक प्रशिक्षण वर्गाचा आज रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, भाईंदर येथे उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वी समारोप झाला. १५ व १६ जून रोजी पार पडलेल्या या दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण वर्गात भारतीय जनता पार्टी व शिवसेना महायुतीचे नागपूर महानगरातील सर्व नगरसेवक सहभागी झाले होते.

समारोप सत्राला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री



मा. देवेंद्रजी फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, "नगरसेवक हा फुटबॉल खेळाडूप्रमाणे असतो. त्याला फॉरवर्ड आणि डिफेंडर अशा दोन्ही भूमिका निभवाव्या लागतात. विकासकामे पुढे नेण्याबरोबरच जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी सजगपणे उभे राहणे हे नगरसेवकाचे कर्तव्य आहे. भारतीय जनता पक्षाचा नगरसेवकाने स्वतःची संकल्पना व जनतेची अपेक्षा यांची सांगड घालत विकासकामांना प्राधान्य दयायला हवा. यावेळी मंचावर माजी खासदार विनयजी सहस्त्रबुद्धे, राज्यसभा खासदार मायाताई ईवनाते, महापौर नीतातार्ई ठाकरे, उपमहापौर लीलाताई हातीबेड, भाजप शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी, माजी आमदार अनिलजी सोले तसेच सत्तापक्ष नेते बाल्या बोरकर उपस्थित होते.समारोपाच्या दिवशी सकाळी भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मा. रविंद्रजी चव्हाण यांनी प्रशिक्षण वर्गाला भेट देऊन नगरसेवकांशी संवाद साधला व त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी लोकप्रतिनिधींनी संघटनात्मक मूल्ये जपत जनतेशी सातत्यपूर्ण संपर्क ठेवावा, शासनाच्या योजना प्रभावीपणे तळागाळापर्यंत पोहोचवाव्यात तसेच विकासाभिमुख आणि पारदर्शक कारभाराद्वारे जनतेचा विश्वास अधिक दृढ करावा, असे आवाहन केले.दोन दिवस चाललेल्या या प्रशिक्षण वर्गात नगरसेवकांना विविध विषयांवर तज्ज्ञ मान्यवरांचे मार्गदर्शन लाभले. नेतृत्व, विकास व संवाद कौशल्य, सोशल मीडिया व कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) चा प्रभावी वापर, केंद्र व राज्य शासनाच्या योजना, प्रशासन व नगरसेवक समन्वय, नागरिकांशी संवाद, प्रभागातील विकासकामे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९, शहर व्यवस्थापन, संघटनाचा इतिहास व विकास, अर्थसंकल्पाचा अभ्यास आणि वित्तीय नियोजन तसेच कार्यकर्ता व सामाजिक संघटनांशी समन्वय अशा विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.या प्रशिक्षणामुळे नगरसेवकांना लोकप्रतिनिधी म्हणून आवश्यक असलेले ज्ञान, कौशल्य, प्रशासकीय समज, संवाद क्षमता आणि विकासाभिमुख दृष्टीकोन प्राप्त झाला. निवासी स्वरूपात आयोजित या प्रशिक्षण वर्गात अभ्यास, चर्चा, अनुभवांची देवाणघेवाण आणि संघटनात्मक संवादाला विशेष प्राधान्य देण्यात आले.समारोप सत्राचे संचालन भाजपा महानगर महामंत्री श्रीकांत आगलावे यांनी केले तर आभार प्रदर्शन बाल्या बोरकर यांनी केले.संपूर्ण प्रशिक्षण वर्गाचे नियोजन रितेश गावंडे व विष्णू चांगदे यांनी यशस्वीपणे पार पाडले. या दोन दिवसीय प्रशिक्षण वर्गाच्या यशस्वी आयोजनामुळे नागपूर महानगरातील नगरसेवक अधिक सक्षम, अभ्यासू आणि जनतेच्या अपेक्षांची प्रभावीपणे पूर्तता करणारे लोकप्रतिनिधी म्हणून कार्य करतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# मृग नक्षत्र कोरडेच, पाऊस गायब; देवणी तालुक्यात शेतकरी तिहेरी संकटाच्या विळख्यात



**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम** : देवणी तालुक्यात मृग नक्षत्राचे आगमन झाले असले तरी अद्याप पाऊस झालेला नसल्याने खरीप हंगामातील पेरण्या रखडल्या आहेत. जून महिना सुरू असूनही वातावरणात उन्हाळ्यासारखी उष्णता कायम असल्याने शेतकरी चिंतेत सापडला आहे. एकीकडे पावसाचा अभाव, दुसरीकडे मागील हंगामातील पीकविमा व नुकसानभरपाईची प्रलंबित प्रकरणे आणि तिसरीकडे वाढता शेती खर्च यामुळे शेतकऱ्यांवर तिहेरी आर्थिक संकट कोसळले आहे.

शेतकरी संघटनांच्या मते, 2025-26 हंगामातील अनेक पीकविमा दावे अद्याप निकाली निघालेले नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना नव्या हंगामासाठी भांडवल उभे करणे कठीण जात आहे. दरम्यान, राज्य शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफीबाबत कठोर निकष लावल्यामुळे अनेक शेतकरी लाभापासून वंचित होत आहे.

शेतकरी वर्गातून विमा कंपन्या, राज्य शासन आणि केंद्र शासन यांच्या कार्यपद्धतीबाबत नाराजी व्यक्त होत असून, पीकविमा योजनेत शेतकऱ्यांना वेळेवर न्याय मिळत नसल्याचा आरोप होत आहे. मात्र शासन किंवा विमा कंपन्यांच्या आर्थिक व्यवहारांबाबत कोणतेही आरोप किंवा शंका यासंदर्भात अधिकृत पुरावे उपलब्ध नसल्याने त्याबाबत अधिकृत चौकशी होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

शेतकऱ्यांची प्रमुख मागणी म्हणजे प्रलंबित पीकविमा तात्काळ वितरित करणे, दुष्काळसदृश परिस्थितीची पाहणी करणे, कर्जमाफीचे जाचक निकष शिथिल करणे आणि खरीप हंगामासाठी विशेष आर्थिक मदत जाहीर करणे , महाडीबीटी द्वारे लाभधारकेची प्रलंबित दुसरी यादी मंजूर करून बियाणाचा लाभ देण्यात यावे, अशी मागणी शेतकरी करत आहे,

# जिल्हा परिषद शाळेतच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण गुणवत्ता विकास – सागर पाटील कुंदे

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : विद्यार्थ्यांचा सर्वांगीण गुणवत्ता विकास हा जिल्हा परिषदेच्या मराठी शाळांमधूनच होत असून समाजातील अनेक डॉक्टर, अभियंते, समाजसेवक आणि कलाकार हे जिल्हा परिषद शाळांचेच विद्यार्थी आहेत, असे प्रतिपादन निफाड नगरपंचायतीचे नगरसेवक सागर पाटील कुंदे यांनी केले. ते जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा निफाड क्रमांक १ येथे आयोजित शालेय प्रवेशोत्सव कार्यक्रमात बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा कल्पना म्हैसधुणे होत्या. प्रमुख अतिथी म्हणून शासकीय तंत्रनिकेतन नाशिकचे अधिव्याख्याता संदीप देवकाते, मुख्याध्यापक निलेश शिंदे, शिक्षणप्रेमी नागरिक सागर पवार, नंदा जाधव, एकनाथ फटांगरे व अश्विनी परदेशी उपस्थित होते.



प्रवेशोत्सवानिमित्त सकाळी विद्यार्थ्यांची भव्य प्रभातफेरी काढण्यात आली. सजविलेल्या वाहनातून काढलेल्या या प्रभातफेरीत विद्यार्थी, पालक, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, सदस्य, नागरिक व शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. "चला चला शाळेला चला" या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

'माझे शाळेतील पहिले पाऊल' या उपक्रमांतर्गत नवागत विद्यार्थ्यांच्या पायांचे कुंकवाच्या गंधामध्ये ठसे घेण्यात आले. तसेच आकर्षक सेल्फी पॉइंट विद्यार्थ्यांसह पालकांचेही विशेष आकर्षण ठरला.

सकाळी दहा वाजता मुख्य प्रवेशोत्सव कार्यक्रमास सुरुवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक निलेश शिंदे यांनी केले. यावेळी सर्व विद्यार्थ्यांचे शुभेच्छापत्र, फुगे, चॉकलेट व गुलाबपुष्प देऊन उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व गणवेशांचे वितरण करण्यात आले.

आपल्या मनोगतात नगरसेवक सागर पाटील कुंदे यांनी जिल्हा परिषद शाळांच्या गौरवशाली परंपरेचा उल्लेख करताना, या शाळेतून घडलेले अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत देशसेवा करत असल्याचे सांगितले. शासकीय तंत्रनिकेतन नाशिकचे अधिव्याख्याता संदीप देवकाते यांनी शाळेचा स्वच्छ व सुंदर परिसर, शैक्षणिक गुणवत्ता आणि मुख्याध्यापक निलेश शिंदे यांच्या प्रभावी प्रशासनाचे विशेष कौतुक केले.

शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांसाठी विशेष मिष्ठान्न भोजनाचे आयोजन करण्यात आले होते. विशेष शिक्षिका शिला मोरे यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना मसाला भात व मोतीचूर बुंदी लाडूंचा स्वादिष्ट बेत देण्यात आला. त्यामुळे प्रवेशोत्सवाची गोडी अधिकच वाढली.

कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापक निलेश शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक कुमार जंगम, विजय शिंदे, आशा भदाणे, वैशाली जंगम, रत्ना अमृतकर, भारती अहीरे, निलिमा कानडे आणि शिला मोरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

सूत्रसंचालन विजय शिंदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन कुमार जंगम यांनी केले.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी उत्साह, आनंद आणि शैक्षणिक बांधिलकीचा सुंदर संगम अनुभवायला मिळाल्याने प्रवेशोत्सव संस्मरणीय ठरला.

# खतांचा खर्च अर्धा, उत्पादन दुप्पट करण्याचा मंत्र! हनवतखेड्यात 'बीज प्रक्रिया व खत बचाव अभियान'ला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद"

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : हनवतखेडा (मालेगाव)शेती उत्पादनाचा वाढता खर्च, रासायनिक खतांच्या किंमतीत होत असलेली सातत्याने वाढ आणि जमिनीची खालावत चाललेली सुपीकता या गंभीर समस्यांवर प्रभावी उपाय म्हणून कृषी विभागाने हनुवतखेडा येथे राबविलेल्या 'बीज प्रक्रिया, उगवण शक्ती चाचणी व खत बचाव अभियानाला' शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शेतकऱ्यांना शाश्वत शेतीचे महत्त्व पटवून देत कमी खर्चात अधिक उत्पादन घेण्याचे आधुनिक तंत्र या अभियानातून प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह समजावून सांगण्यात आले.

कृषी विभागाच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या या अभियानाचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करणे, जमिनीची सुपीकता टिकवून ठेवणे आणि संतुलित खत व्यवस्थापनाचा संदेश गावागावात पोहोचवणे हा होता. कार्यक्रमादरम्यान शेतकऱ्यांना बीज प्रक्रिया, उगवण शक्ती चाचणी, मृदा आरोग्य आणि खत बचतीसंदर्भात सखोल मार्गदर्शन करण्यात आले.




कार्यक्रमात सहाय्यक कृषी अधिकारी युवराज शिंदे यांनी रासायनिक खतांचा अतिरेकी वापर शेतीसाठी कसा घातक ठरतो याची माहिती दिली. त्यांनी मृदा परीक्षणाच्या आधारेच खतांचा वापर करण्याचे महत्त्व स्पष्ट केले. शेतकऱ्यांनी जमिनीच्या गरजेनुसार संतुलित प्रमाणात खतांचा वापर केल्यास उत्पादन खर्चात मोठी बचत होऊन उत्पन्नात वाढ होऊ शकते, असे त्यांनी सांगितले. तसेच बीज प्रक्रियेचे महत्त्व आणि उगवण क्षमतेची चाचणी करून दर्जेदार बियाण्यांची निवड कशी करावी याबाबत प्रात्यक्षिकेही दाखविण्यात आली.

यावेळी कृषी विभागाच्या स्वाती भगत आणि प्रेमलता ताडके यांनी सेंद्रिय शेती, सेंद्रिय खतांचा वाढता वापर आणि पिकनिहाय खत नियोजन या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करून सेंद्रिय घटकांचा वापर वाढविल्यास जमिनीचा पोत सुधारतो, उत्पादनाची गुणवत्ता वाढते आणि दीर्घकालीन शेती अधिक फायदेशीर ठरते, असे त्यांनी सांगितले.

सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक विजय दुधे यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत मृदा आरोग्य जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले. "संतुलित खत व्यवस्थापन ही काळाची गरज असून अनावश्यक खतांचा वापर टाळल्यास शेतकऱ्यांचा खर्च कमी होईल आणि पर्यावरणपूरक शेतीला चालना मिळेल," असे त्यांनी नमूद केले. त्यांनी विविध शासकीय योजनांची माहिती देत शेतकऱ्यांना त्यांचा लाभ घेण्याचे आवाहनही केले.

सदर अभियान तालुका कृषी अधिकारी कैलास देवकर, मंडळ कृषी अधिकारी अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपकृषी अधिकारी रवींद्र मापारी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. कार्यक्रमादरम्यान शेतकऱ्यांनी खत व्यवस्थापन, पीक संरक्षण, मृदा परीक्षण, बियाण्यांची निवड आणि शासकीय योजनांबाबत विविध प्रश्न उपस्थित केले. कृषी अधिकाऱ्यांनी त्यांचे समाधानकारक निरसन करत प्रत्यक्ष उपाययोजनांची माहिती दिली.

या उपक्रमाला गावातील आणि परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. गावचे सरपंच, प्रवीण भगत, रोहित राऊत, स्वाती भगत, प्रेमलता ताडके आणि संगीता राऊत यांच्यासह अनेक मान्यवरांनी अभियानाचे कौतुक केले. उपस्थित शेतकऱ्यांनीही अशा प्रकारचे मार्गदर्शनपर उपक्रम नियमितपणे आयोजित करण्याची मागणी केली.

हनवतखेडा येथे पार पडलेल्या या अभियानामुळे शेतकऱ्यांमध्ये "खत बचत – उत्पादन वाढ", "मृदा आरोग्य – समृद्ध शेती" आणि "संतुलित खत व्यवस्थापन – शाश्वत विकास" या संकल्पनांविषयी मोठ्या प्रमाणात जागरूकता निर्माण झाली आहे.

कृषी विभागाच्या या उपक्रमामुळे आगामी काळात गावातील शेतकरी अधिक वैज्ञानिक पद्धतीने शेती करत उत्पादन खर्च कमी करून अधिक नफा मिळवतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाने केले शैक्षणिक साहित्याचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**पनवेल(प्रतिनिधी) :** सक्रिय पत्रकारांची नोंदणीकृत संस्था म्हणून नावलौकिक असणाऱ्या पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाने रायगड जिल्हा परिषदेतील शाळांमधून शैक्षणिक वाटप करत आपली परंपरा जपली आहे. बुधवार दिनांक 17 जून रोजी सुकापुर केंद्र अंतर्गत येणाऱ्या चिपळे रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये ज्येष्ठ पत्रकार तथा सल्लागार माधव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तर राजेंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली शैक्षणिक वाटप कार्यक्रम संपन्न झाला.

पनवेल तालुका पत्रकार विकास मंच या पत्रकारांच्या सेवाभावी संस्थेने गेल्या दोन दशकापासून शैक्षणिक साहित्य वाटप करण्याची परंपरा अखंडपणे राबविली आहे. यंदाचे वर्षी प्रत्येक विद्यार्थ्याला एक बटण छत्री, स्वच्छता किट, एक लाँग बुक, दोन शॉर्ट बुक, पेन पट्टी पेन्सिल खोडरबर शार्पनर किट आणि गुड डे बिस्किट्स असे साहित्य प्रदान करण्यात आले. मुख्याध्यापिका माधवी दिवेकर यांनी पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या सर्व सदस्यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. मंचाचे सल्लागार मंदार दोंदे यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले तसेच पनवेल तालुका पत्रकार विकास मंच सातत्याने करत असलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचे बाबत उपस्थितांना अवगत केले. शिक्षिका प्रिया भोसले यांनी शैक्षणिक वर्ष 26- 27 करता साहित्य वाटप केल्याबद्दल पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे आभार मानले. पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या माध्यमातून यापूर्वी रायगड जिल्हा परिषद अंतर्गत शाळांना ई लर्निंग सिस्टीम, संगणक, ध्वनीक्षेपक, वर्ग बांधून देणे, कपाटे, बोलक्या भिंती रंगवून देणे अशा प्रकारे सहाय्य करण्यात आले आहे.



मागच्या वर्षी पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाने 100 देशी वृक्षांचे रोपण केले,150 मुलींना "गुड टच बॅड टच" याचे तज्ञांचे माध्यमातून समुपदेशन केले. पत्रकार सदस्यांना अपघात विमा वाटप देखील करण्यात आला आहे. यावेळी अध्यक्ष राजेंद्र पाटील यांनी लवकरच 2000 वृक्षारोपणाचा भव्य कार्यक्रम आम्ही हाती घेणार असल्याचे सांगितले तसेच समाजाची दिशा आणि दशा ठरवणाऱ्या जेष्ठ विचारवंतांची व्याख्यानमाला देखील आयोजित करणार असल्याची घोषणा केली. समाजातील घटना घडामोडी सातत्याने प्रकाशित करणारी सजग लेखणी जोपासणारे मंचातील सदस्य सामाजिक जाणीव जागृत ठेवून समाजातील अखेरच्या घटकापर्यंत पोहोचत आपले योगदान देत असल्याबद्दल धनंजय पाटील यांनी मंचातील सदस्यांचे कौतुक केले. चिपळे येथील शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रमाला पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे सल्लागार तथा ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील, अध्यक्ष राजेंद्र पाटील, सल्लागार मंदार दोंदे, सल्लागार विवेक पाटील, सल्लागार संजय कदम, उपाध्यक्ष दीपक घोसाळकर, सरचिटणीस हरेश साठे खजिनदार दत्ता कुलकर्णी, सन्माननीय सदस्य प्रवीण मोहोकर, आजीव खजिनदार नितीन कोळी, लालचंद यादव, चिपळे माजी उपसरपंच धनंजय पाटील, पराग म्हात्रे अक्षय पाटील, अजय पाटील, शिक्षिका प्रिया भोसले यांची सन्माननीय उपस्थिती होती.

# अकोटमध्ये शिक्षकांसाठी अभिनव प्रशिक्षण कार्यशाळा !!

## संगीत मैफिलीतून मिळाला निरामय जगण्याचा संदेश !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/ प्रतिनिधी:** स्थानिक सेंट पॉल्स अर्कडमी अकोट येथील सभागृहात शिक्षकांसाठी एक दिवसीय विशेष प्रशिक्षण कार्यशाळा आणि सांस्कृतिक संमेलनाचे अत्यंत भव्य आयोजन करण्यात आले होते. या नाविन्यपूर्ण उपक्रमात परिसरातील शेकडो शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या संपूर्ण प्रशिक्षण सत्राचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे व्यावसायिक ताणतणाव व्यवस्थापन आणि जीवन मूल्यांवर आधारित 'जिंदगी का सफर' हा विशेष प्रबोधनात्मक संगीत कार्यक्रम! चंद्रकांत तिवारी यांनी आपल्या अमोघ वक्तृत्वाने आणि सुमधुर गायनाने संपूर्ण सभागृहाला मंत्रमुग्ध केले.

चंद्रकांत तिवारी यांनी आपल्या २५ वर्षांच्या प्रदीर्घ प्रशासकीय अनुभवाचा संदर्भ देत, शिक्षकी पेशातील वाढता ताण, व्यवस्थापन आणि शिक्षक यांच्यातील समन्वय, आणि सकारात्मक जीवनशैली यावर अत्यंत प्रभावी मार्गदर्शन केले. केवळ कोरडे भाषण न देता, त्यांनी किशोर कुमार यांच्या अजरामर गीतांचा आधार घेत अत्यंत सुश्राव्य संगीतमय सादरीकरण केले. 'मुसाफिर हूँ यारों', 'ये जीवन है' आणि 'ओ पालनहारे' यांसारख्या गीतांमधून त्यांनी उपस्थित शिक्षकांना जीवनाचा खरा अर्थ समजावून सांगितला. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात झालेल्या अभंग आणि भजन जुगलबंदीवर (जॅमिंग) संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या कडकडाटात झुलू लागले.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष नवनीत लखोटिया,सचिव प्रमोद चांडक आणि उपाध्यक्ष लूनकरण डागा तसेच प्राचार्य विजय बिहाडे,ममता श्रावगी आणि रिंकू अग्रवाल उपस्थित होते. हिवरखेड शाखेचे प्राचार्य व प्रशिक्षक चंद्रकांत तिवारी यांनी प्राचार्य विजय बिहाडे यांचा मंचावर जाहीर सत्कार करून एक नवा आदर्श घालून दिला.


दोन्ही शाळांच्या प्राचार्यांनी दाखवलेला हा अद्भूत समन्वय आणि बंधुभाव या कार्यक्रमाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य ठरले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दोन्ही विद्यालयांच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अतोनात परिश्रम घेतले. अकोट परिसरातील शिक्षण क्षेत्रासह सामाजिक स्तरावरही या अभिनव आणि सात्विक उपक्रमाचे प्रचंड कौतुक होत आहे.

# कर्जमाफी द्या, नाहीतर आंदोलनाची ज्वाला राज्यभर पेटेल!"

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : अडोळी, (वाशिम) राज्यातील शेतकरी अभूतपूर्व आर्थिक संकटाचा सामना करीत असताना सरकारकडून अपेक्षित दिलासा मिळत नसल्याने शेतकऱ्यांच्या संतापाचा उद्रेक आता रस्त्यावर दिसू लागला आहे. क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या सरसकट कर्जमाफी आंदोलनाला पाठिंबा देत अडोळी येथील शेतकऱ्यांनी सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेत स्वतःची दुचाकी पेटवून निषेध नोंदविला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून शेतकरी प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आले आहेत.

शेतकऱ्यांनी यावेळी जोरदार घोषणाबाजी करत सरकारच्या धोरणांविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. "शेतकरी वाचवा", "सरसकट कर्जमाफी द्या", "शेतीमालाला हमीभाव द्या" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. आंदोलनकर्त्यांनी सांगितले की, दिवसेंदिवस वाढणारा उत्पादन खर्च, रासायनिक खतांचे वाढते दर, बियाण्यांचा खर्च, नैसर्गिक आपत्ती, पिकांचे नुकसान आणि बाजारात मिळणारा अपुरा दर यामुळे शेतकरी अक्षरशः आर्थिकदृष्ट्या कोलमडून पडला आहे.



अनेक शेतकरी बँका, पतसंस्था आणि खासगी सावकारांच्या कर्जाच्या विळख्यात अडकले असून कर्जफेड करणे अशक्य झाले आहे. अशा परिस्थितीत सरकारने केवळ आश्वासनांची खैरात न करता तात्काळ सरसकट कर्जमाफी जाहीर करावी, अशी ठाम मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. शेतकऱ्यांच्या मते, राज्यातील लाखो कुटुंबांचे भविष्य या निर्णयावर अवलंबून असून सरकारचा विलंब शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करीत आहे.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला की, सरकारने शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास आंदोलन आणखी उग्र करण्यात येईल. जिल्हाभरात तसेच राज्यभर विविध स्वरूपाची आंदोलने उभी राहतील आणि त्याची संपूर्ण जबाबदारी सरकारवर राहील, असे त्यांनी ठणकावून सांगितले.

दुचाकी जाळण्याच्या या आंदोलनामुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच अनेक नागरिक घटनास्थळी जमा झाले. मोठ्या संख्येने उपस्थित शेतकऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त करत सरकारविरोधात रोष व्यक्त केला. आंदोलनाला परिसरातील शेतकरी बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, हा लढा कोणत्याही राजकीय स्वार्थासाठी नसून शेतकऱ्यांच्या अस्तित्वासाठी आहे.

**अडोळी येथे शेतकऱ्यांचा संताप अनावर; सरकारच्या निषेधार्थ दुचाकी जाळून तीव्र आंदोलन, रविकांत तुपकरांच्या लढ्याला जोरदार पाठिंबा.**

शेतकरी आज आर्थिक संकटाच्या कडेलोटावर उभा असून त्याला वाचविण्यासाठी सरकारने तातडीने सकारात्मक निर्णय घेणे गरजेचे आहे. सरसकट कर्जमाफीसह शेतीमालाला कायदेशीर हमीभाव, पीकविमा योजनेतील त्रुटी दूर करणे, नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची मदत आणि शेतीसाठी आवश्यक निविष्ठा परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

अडोळी येथील या आंदोलनाने राज्य सरकारसमोर शेतकरी प्रश्नांचे गांभीर्य पुन्हा अधोरेखित केले आहे. एका दुचाकीच्या ज्वालांमधून व्यक्त झालेला शेतकऱ्यांचा संताप आता व्यापक जनआंदोलनाचे रूप धारण करण्याची चिन्हे दिसत असून सरकार या आंदोलनाची कितपत दखल घेते, याकडे संपूर्ण जिल्ह्यासह राज्यातील शेतकरी बांधवांचे लक्ष लागले आहे.

# लकडगंज पोलिसांची अनोळखी जबरी चोरी करणाऱ्या आरोपीला पकडून केलेली कामगिरी

## जबरी चोरीचा गुन्हा अवघ्या 06 तासांत उघडकीस; 03 सराईत आरोपी जेरबंद, 100% मुद्देमाल हस्तगत

**दैनिक युवक आधार**

**नागपूर सतीश कडू संपादक विभाग** : नागपूर शहर पोलीस दलाच्या गुन्हे प्रतिबंधक व गुन्हे उघडकीस आणण्याच्या प्रभावी कार्यपद्धतीचा प्रत्यय देणारी उल्लेखनीय कामगिरी पोलीस स्टेशन लकडगंजच्या तपास पथकाने केली आहे. जबरी चोरीच्या गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्याचा अवघ्या 06 तासांत छडा लावत तीन आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्ह्यातील संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

दि. 13 जून 2026 रोजी रात्री फिर्यादी कुलदीप किशन सिंग ठाकूर (वय 28 वर्ष) हे धरमपेठ येथे जाण्यासाठी मॅक्सी रिक्षामध्ये बसले असता तीन अनोळखी आरोपींनी संगनमत करून त्यांना मालधक्का रोड, रॉयल रेसिडेन्सी समोर, इतवारी रेल्वे पटरी परिसरात नेले. तेथे आरोपींनी फिर्यादीस लाकडी दांड्याने मारहाण करून त्यांना भयभीत केले व त्यांच्या ताब्यातील मोबाईल फोन व रोख रक्कम बळजबरीने हिसकावून नेली.

सदर घटनेच्या अनुषंगाने पोलीस स्टेशन लकडगंज येथे अप.क्र. 331/2026, कलम 309(6), 3(5) भारतीय न्याय संहिता अन्वये अनोळखी आरोपींविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार विशेष तपास पथक नियुक्त करण्यात आले.



तपासादरम्यान घटनास्थळ परिसरातील बारकाईने गुन्ह्याची मोडस विश्लेषण करण्यात आले. तांत्रिक पुरावे, गोपनीय माहिती, स्थानिक माहितीदारांचे जाळे तसेच तपास पथकाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या आधारे आरोपींची ओळख पटविण्यात आली व त्यांना तात्काळ ताब्यात घेण्यात आले.

**अटक आरोपी**

1. शेख वसीम शेख हाशिम (वय 31 वर्ष), रा. यशोधरा नगर, नागपूर.

2. निलेश संतोष मेंढोळे (वय 23 वर्ष), रा. प्रेमनगर, शांतिनगर, नागपूर.

3. शेख वसीम उर्फ अकम मोहम्मद रफीक (वय 38 वर्ष), रा. टिमकी तीन खंबा चौक, तहसील, नागपूर.

सखोल तपासदरम्यान आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली असून त्यांच्या ताब्यातून गुन्ह्यात वापरण्यात आलेला अंदाजे 1,00,000 रुपये किमतीचा इलेक्ट्रिक ऑटो, चोरीस गेलेला मोबाईल फोन तसेच रोख रक्कम असा गुन्ह्यातील 100 टक्के मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यातील एक आरोपी शेख वसीम शेख हसिम पो ठाणे शांतीनगर हद्दीतील क्राईम रेकॉर्ड वरील गुन्हेगार असून त्यांच्याविरुद्ध पूर्वीही विविध प्रकारचे गुन्हे नोंद असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

सदरची उल्लेखनीय कारवाई मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. 03 राहुल मदने तथा मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, लकडगंज विभाग शिवप्रसाद पारवे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुकुंद कवाडे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) मनोज चौधरी, सहाय्यक पोलीस निरीक्षक अजार शेख व पोलीस उपनिरीक्षक सागर शिंदे, सखाराम कांबळे यांच्या नेतृत्वात यशस्वीपणे पार पाडण्यात आली.

या कारवाईत पोलीस हवालदार निलेश घायवट, उमाकांत नागदेवे तसेच पोलीस शिपाई प्रभाकर मानकर, प्रदीप गेडाम, सुनील कोंडे, नौशाद शेख, देवेंद्र शेलूरकर, आशिष बांते, ईश्वर मोहेकर व चंद्रकांत केंद्रे यांनी गुप्त माहिती संकलन, आरोपींचा शोध व अटक कारवाईमध्ये अत्यंत मोलाची भूमिका बजावली.

अवघ्या 06 तासांत गंभीर स्वरूपाचा जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस आणून आरोपींना जेरबंद करणे व गुन्ह्यातील संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करणे ही लकडगंज पोलिसांच्या उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

नागरिकांनी कोणतीही संशयास्पद हालचाल, गुन्हेगारी प्रवृत्तीची व्यक्ती अथवा समाजविघातक कृत्ये आढळून आल्यास तात्काळ 112 आपत्कालीन सेवा किंवा जवळच्या पोलीस स्टेशनशी संपर्क साधून पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस स्टेशन लकडगंजतर्फे करण्यात आले आहे.

# सामाजिक कार्यकर्त्या प्रतिमा जुमडे यांना शिवछत्रपती प्रेरणा पुरस्कार

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी. रणजितसिह. ठाकूर** : सौ.प्रतिमा अमोल जुमडे (न्यू विदर्भ मेडिकल,रिसोड) नुकत्याच झालेल्या विद्यार्थी हक्क कृती समिती महाराष्ट्र राज्य वाशिम जिल्हा नियुक्ती समारंभ व गुणवंत विद्यार्थी तसेच सामाजिक कार्यकर्त्यांना शिवछत्रपती प्रेरणा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले त्यामध्ये मी ही शिवछत्रपती प्रेरणा पुरस्काराने सन्मानित झाले. मला सांगताना खूप आनंद होत आहे की हा फक्त एक पुरस्कार नसून एक आमच्यासाठी एक मोठी प्रेरणा आहे व आम्हाला आमच्या भविष्यामध्ये अजून प्रगती करण्यासाठी एक मिळालेली दिशा आहे सुमित मधुकर जमदाडे सर यांनी आयोजित केलेला कार्यक्रम अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने पार पडला आहे त्यात अध्यक्ष स्थान नगराध्यक्ष भगवान दादा क्षीरसागर सरांचे लाभले असून मार्गदर्शन तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर मॅडमने केले.त्यांनी मार्गदर्शन करत असतांना सांगितले की, विद्यार्थ्याची गुणवत्ता ही त्याच्या टक्केवारीवरून न ठरवता त्याच्या बुद्धिमतेवर अवलंबून आहे. तसेच व्यसनमुक्त पिढी कशी तयार करता येईल यावर त्यांनी भर दिला व बरेच उदाहरण देऊन ती संकल्पना आम्हाला समजून सांगितली. तसेच पत्रकार केशव गरकळ सर उपस्थित होते,अमोल लोथे सर व पंचायत समितीचे सदस्य राहुल बोडखे सर तसेच विद्यार्थी वर्ग व युवा कार्यकर्ते उपस्थित होते आणि सर्व विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन सिद्धार्थ इंगोले सरांनी केले. ह्या पुरस्कार वितरन सोहळ्या विषयी मनोगत व्यक्त करतांना एक गोष्ट सांगावीशी वाटते की आपण समाजात आपले योगदान



निस्वार्थपणे देत रहावे, ते करत असतांना नकळत समाज त्या कार्याची नोंद घेत असतो आणि कुठे ना कुठे आपण सन्मानित होत असतो. सामाजिक कार्य म्हणजे सत्कार्य च नव्हे तर समाजात एक चांगला व्यक्ती म्हणून जगणे म्हणजे सामाजिक कार्य होय, तसेच आपल्यापासून कोणाला कोणताही त्रास न होता सामाजिक बांधिलकी जपून एक सुंदर आयुष्य जगणे म्हणजे सामाजिक कार्य होय. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचाली साठी खूप खूप शुभेच्छा देते आणि आम्हाला सन्मानित केल्या बद्दल आयोजक सुमित जमधाडे सर (वाशिम जिल्हाध्यक्ष) ह्यांचे मनापासून आभार व्यक्त करते.

मी सौ.प्रतिमा अमोल जुमडे (न्यू विदर्भ मेडिकल,रिसोड) नुकत्याच झालेल्या विद्यार्थी हक्क कृती समिती महाराष्ट्र राज्य वाशिम जिल्हा नियुक्ती समारंभ व गुणवंत विद्यार्थी तसेच सामाजिक कार्यकर्त्यांना शिवछत्रपती प्रेरणा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले त्यामध्ये मी ही शिवछत्रपती प्रेरणा पुरस्काराने सन्मानित झाले.

मला सांगताना खूप आनंद होत आहे की हा फक्त एक पुरस्कार नसून एक आमच्यासाठी एक मोठी प्रेरणा आहे व आम्हाला आमच्या भविष्यामध्ये अजून प्रगती करण्यासाठी एक मिळालेली दिशा आहे सुमित मधुकर जमदाडे सर यांनी आयोजित केलेला कार्यक्रम अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने पार पडला आहे त्यात अध्यक्ष स्थान नगराध्यक्ष भगवान दादा क्षीरसागर सरांचे लाभले असून मार्गदर्शन तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर मॅडमने केले.त्यांनी मार्गदर्शन करत असतांना सांगितले की, विद्यार्थ्याची गुणवत्ता ही त्याच्या टक्केवारीवरून न ठरवता त्याच्या बुद्धिमतेवर अवलंबून आहे. तसेच व्यसनमुक्त पिढी कशी तयार करता येईल यावर त्यांनी भर दिला व बरेच उदाहरण देऊन ती संकल्पना आम्हाला समजून सांगितली. तसेच पत्रकार केशव गरकळ सर उपस्थित होते,अमोल लोथे सर व पंचायत समितीचे सदस्य राहुल बोडखे सर तसेच विद्यार्थी वर्ग व युवा कार्यकर्ते उपस्थित होते आणि सर्व विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन सिद्धार्थ इंगोले सरांनी केले. ह्या पुरस्कार वितरन सोहळ्या विषयी मनोगत व्यक्त करतांना एक गोष्ट सांगावीशी वाटते की आपण समाजात आपले योगदान निस्वार्थपणे देत रहावे, ते करत असतांना नकळत समाज त्या कार्याची नोंद घेत असतो आणि कुठे ना कुठे आपण सन्मानित होत असतो.

सामाजिक कार्य म्हणजे सत्कार्य च नव्हे तर समाजात एक चांगला व्यक्ती म्हणून जगणे म्हणजे सामाजिक कार्य होय, तसेच आपल्यापासून कोणाला कोणताही त्रास न होता सामाजिक बांधिलकी जपून एक सुंदर आयुष्य जगणे म्हणजे सामाजिक कार्य होय. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचाली साठी खूप खूप शुभेच्छा देते आणि आम्हाला सन्मानित केल्या बद्दल आयोजक सुमित जमधाडे सर (वाशिम जिल्हाध्यक्ष) ह्यांचे मनापासून आभार व्यक्त करते.

# उरणच्या आकाशावर केमिकल धुराचे सावट?


## अर्धा जून उलटला तरी पावसाचा पत्ता नाही

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : कोकणातील पावसासाठी प्रसिद्ध असलेल्या रायगड जिल्ह्यात यंदा मान्सूनने अक्षरशः पाठ फिरवल्याचे चित्र दिसत आहे. जून महिना अर्धा उलटून गेला तरी दमदार पावसाची एकही सर कोसळलेली नसल्याने उरणसह संपूर्ण रायगड जिल्ह्यात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकरी, नागरिक, व्यापारी आणि प्रशासन यांची नजर आता आकाशाकडे खिळली असून "पाऊस कधी येणार?" हा प्रश्न सर्वांनाच सतावत आहे.

15जूनपर्यंतच्या अधिकृत आकडेवारीनुसार रायगड जिल्ह्यात वार्षिक सरासरीच्या तुलनेत अवघा २.६ टक्के पाऊस झाला आहे. विशेष म्हणजे, 2025 मध्ये याच कालावधीत जिल्ह्यात तब्बल 53 टक्के पाऊस झाला होता. जून महिन्याची सरासरी 327.9मिमी असताना यंदा केवळ 8.5 मिमी पावसाची नोंद झाली आहे. 15 जून रोजी तर संपूर्ण जिल्ह्यात सरासरी फक्त 0.1मिमी पाऊस पडल्याची नोंद आहे. ही आकडेवारीच यंदाच्या मान्सूनची निराशाजनक स्थिती स्पष्ट करते. त्यामुळे उरण तालुक्यात अनेक भागांमध्ये पाणीकपात सुरू झाली असून विहिरी आणि जलस्रोतांची पातळी खालावत आहे. पावसाने आणखी दडी मारल्यास भीषण पाणीटंचाईचे संकट निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, उरणमध्ये वाढत्या औद्योगिकीकरणामुळे निर्माण होणाऱ्या



प्रदूषणाकडेही बोट दाखवले जात आहे. जेएनपीए परिसरासह विविध औद्योगिक पट्ट्यांमध्ये कार्यरत असलेल्या अनेक केमिकल कंपन्यांकडून वातावरणात सोडला जाणारा रासायनिक धूर आणि वायूप्रदूषण याचा परिणाम स्थानिक पर्यावरणावर होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. हवेत वाढणारे प्रदूषण, बदलणारे हवामान आणि अनियमित पावसाचे चक्र यांचा परस्पर संबंध असल्याचे पर्यावरण अभ्यासकांचे मत आहे.

याशिवाय विकासाच्या नावाखाली उरणमधील डोंगरांचे सपाटीकरण, मोठ्या प्रमाणावर झाडांची कत्तल, जंगलांचा ऱ्हास आणि सिमेंटच्या जंगलांचे वाढते साम्राज्य यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत चालला आहे. एकेकाळी हिरवाईने नटलेला परिसर आता काँक्रीटच्या इमारतींनी व्यापला आहे. पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याऐवजी थेट नाल्यांमार्फत समुद्रात वाहून जात आहे. त्यामुळे भूजल पातळी सातत्याने घटत असून त्याचे परिणाम आता स्पष्टपणे जाणवू लागले आहेत.

उरण तालुका मराठी पत्रकार संघाने यापूर्वीच प्रशासनाला रेन वॉटर हार्वेस्टिंग सक्तीचे करणे, विहिरी व तलावांचे पुनरुज्जीवन करणे आणि व्यापक जलसंधारण मोहीम राबविण्याची मागणी केली होती. मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप होत आहे. परिणामी आज उरणकरांवर पाणीकपातीचे संकट ओढवले आहे. पावसाअभावी शेतकरी वर्गही हवालदिल झाला आहे. भातशेतीची मशागत पूर्ण करून शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. मात्र आभाळ कोरडेच असल्याने शेतीचे संपूर्ण नियोजन धोक्यात आले आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, "निसर्गावर सातत्याने होत असलेले आक्रमण, झाडांची कत्तल, डोंगरांची तोड आणि वाढते प्रदूषण यामुळेच निसर्गाचा समतोल बिघडत आहे. त्याचा फटका आता पावसाच्या रूपाने बसू लागला आहे." पर्यावरणप्रेमींच्या मते, "झाडे लावा, झाडे जगवा" हा केवळ घोषणांचा विषय राहिलेला नाही, तर तो आता अस्तित्वाचा प्रश्न बनला आहे. विकासाच्या नावाखाली निसर्गाची होणारी हानी थांबवली नाही तर भविष्यात दुष्काळ, पाणीटंचाई, वाढते तापमान आणि अनियमित पाऊस यांसारखी संकटे अधिक तीव्र होतील. उरणकरांमध्ये आता एकच भावना व्यक्त होत आहे. "डोंगर फोडा, झाडे तोडा, खाड्या बुजवा आणि मग पाऊस पडत नाही म्हणून आभाळाला दोष द्या, हा दुटप्पीपणा थांबला पाहिजे. निसर्ग सर्व काही सहन करतो; पण जेव्हा तो हिसाब मागतो, तेव्हा कोणालाही माफी देत नाही. झाडे लावा, झाडे जगवा, अन्यथा निसर्गाचा कोप आणखी भयावह होईल!"

# केऱ्हाळा सोसायटीच्या चेअरमनपदी भाऊलाल राजपूत, तर व्हाईस चेअरमनपदी शिवाजी कुमावत यांची बिनविरोध निवड




**दैनिक युवक आधार**

**केऱ्हाळा (ता. सिल्लोड)** : येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी भाऊलाल राजपूत तर व्हाईस चेअरमनपदी शिवाजी कुमावत यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल सिल्लोड येथील आमदार अब्दुल सत्तार यांच्या 'सेना भवन' जनसंपर्क कार्यालयात नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी बोलताना उपस्थित मान्यवरांनी नवनिर्वाचित चेअरमन, व्हाईस चेअरमन आणि सर्व संचालकांचे अभिनंदन केले. सोसायटीच्या माध्यमातून शेतकरी व सभासदांच्या हितासाठी प्रभावीपणे कार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. याप्रसंगी जिल्हा बँकेचे माजी चेअरमन अर्जुन पा. गाढे, जि. प. सदस्य देविदास पालोदकर, राजूबाबा काळे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल, कृउबा समितीचे संचालक दामूअण्णा गव्हाणे, नानासाहेब रहाटे, सतीश ताठे, जयराम चिंचपुरे, नॅशनल सहकारी सूतगिरणीचे संचालक राजेंद्र ठोंबरे यांची प्रमुख उपस्थिती होती.तसेच सोसायटीचे नवनिर्वाचित संचालक दत्ता कुडके, विजय हाडोळे, सुनीता आकाशराव पांढरे , जनकाबाई नामदेव पांढरे, गणपत म्हस्के, एकनाथ पांढरे, तेजराव पवार, हकीम पठाण, कृष्णा पांढरे, खालेक पटेल, सांडू खा यांच्यासह नामदेव पांढरे, विनायक पांढरे, देवीदास पांढरे, पुजाराम दारुटे, संपत पांढरे, संतोष देहाडे, आजिनाथ पांढरे, अक्षय माने, शिवाजी बोराडे, आकाशराव पांढरे आदींची उपस्थिती होती.

# "आपली माणस आपली शाळा" पालक वर्गात वातावरण आनंदाचे!

## जेएनपीए प्रशासनाने संस्थेवर टलेला विश्वाससार्थ करू : ब्रम्हानंद पाटील

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : 15 जून पासून 2026-27 याशैक्षणिक वर्षाचा शुभारंभ झाला , भारतांतील नंबर वन आणि जगांतील बंदरामध्ये 10 क्रमांकावर असणाऱ्या हायटेक जेएनपीए बंदरातील निवासी संकुलाच्या अवरांतील विद्यालयाच्या घंटेचा नाद आसमंतात घुमला विद्यालयाच्या आवारात किलबिल सुरु झाली विद्यालयाच्या भिंती बोलक्या झाल्या. प्रवेश व्दारावर विद्यार्थ्यांसह शिक्षक आणि शिक्षिकेतर कर्मचार्यांची धावपळ सुरु होती पालक वर्गातही "आपली माणस आपली शाळा"म्हणून वातावरण आनंदाचे आणि अत्यंत उत्साहाचे होते, आज शाळेचा पहिला दिवस सुरु होणार होता, रांगोळ्यांनी सजविलेल्या प्रवेशव्दारावर विद्यार्थ्यांनी फुलांची उधलण करीत साईट्रस्टचे सचिव ब्रम्हानंद पाटील आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ.सोनाली मॅडमचे भव्य स्वागत



करण्यात आले. महाराष्ट्रात शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्य असणाऱ्या साई संस्था (ट्रस्ट) डोंबिवली यांच्या शैक्षणिक संकुलाकडे 2026-27 या शैक्षणिक वर्षा पासून जेएनपीए मराठी मध्यम आणि इंग्रजी मध्यम या दोन्ही विद्यालयाचा कारभार आत्ता साई संस्थेच्या हातात दिला असल्यामुळे परिसरांतील पालक वर्गात आनंदाचे वातावरण असून उरण



परिसरांतून जेएनपीएचे अध्यक्ष,सेक्रेटरी आणि बरोबरीनेच या संस्थेचे अध्यक्ष नरसू पाटील व साई ट्रस्टचे सर्व पदाधिकारी यांच्यावर अभिनंदनाच वर्षाव होत आहे.

महाराष्ट्रात शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या साईसंस्था (ट्रस्ट) डोंबिवलीया संस्थेच्या वतीने डोंबिवली येथे मराठी, गुजराथी, इंग्रजी मध्यमाच्या बरोबरीने गत वर्षी आणखीन एक स्कूल सुरु केले आहे. गेली 18 वर्षा पेक्षा अधिक काळ कार्यरत आहे,तर रायगड-माणगाव येथे गेली 24 वर्षा पेक्षा अधिक काळ इंग्रजी माध्यमाचे स्कूल कार्यरत आहे,या सर्व शैक्षणिक वर्षात या सर्व विद्यालयाने आपल्या शालांत परीक्षेच्या100%टक्के लाऊन निकालाची परंपरा आजही राखून ठेवली आहे.मागील चार वर्षात संस्थेच्या वतीने उरण येथे नगराजशेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूल व बरोबरीने कोल्हापूर गडहिंग्लज येथे इ.बी.गडकरी रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय कार्यरत असून गत वर्षी नरसू पाटील कॉलेज ऑफ फ़िजिओ थेरपी या आणखी एका नवीन वैद्यकीय महाविद्यालयाचा समावेश या साई संस्थेच्या शैक्षणिक संकुलात झालेला आहे.